# पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती सभा
## कार्यपत्रिका क्र.४८,दि.९/२/२०१६
## सभा क्र.७९,दि.९/२/२०१६ चा वृत्तांत

नगरसचिव
विषय क्र. २२७४ ते २२९४
दा.वि.क्र. २२९५ ते २३६१
ठराव क्र. २२७८ ते २३६५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ९/२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

३. मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत
४. मा.सौ.ओरसे शारदा शंकर
५. मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम
६. मा.ॲड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते
८. मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद
९. मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश
११. मा.तुपेरे राहूल बापू
१२. मा.बागवे अविनाश रमेश
१३. मा.सौ.बाबर आरती साईनाथ
१४. मा. राणे अनिल बाबूराव
१५. मा.सौ.लोणकर नंदा नारायण
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. सुभाष जगताप | मा.अनिल टिंगरे | मा.सचिन दोडके | मा.सौ.चंचला कोद्रे |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :-

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
३. मा. ओमप्रकाश बकोरिया,अति. महा. आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. मा.अभिषेक कृष्णा, अध्यक्ष व व्यव. संचालक,पीएमपीएमएल
६. मा.राजेंद्र शेवाळे, उपनगरसचिव
७. मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.)
८. मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक)
९. मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख)
१०. मा.अनिल पवार, उप आयुक्त (विशेष)
११. मा.मोरे दगा पितांबर, मुख्य कार्यकारी अधिकारी (पी.एम.पी.एम.एल.)
१२. मा.प्रकाश बोरसे, उप आयुक्त (जिं.घ.)
१३. मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
१४. मा.विजय दहीभाते, उप आयुक्त (तांत्रिक)
१५. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख
१६. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. मा. विलास कानडे, सह.महा.आयुक्त स्थानिक संस्था कर
१८. मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता
१९. मा. मा.राजेंद्र राऊत, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
२०. मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि.
२१. मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
२२. मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी
२३. मा.माधव जगताप, प्र.उप आयुक्त अतिक्रमण
२४. मा.घोरपडे, मुख्यउद्यान अधिक्षक
२५. मा.नितिन उदास, उप आयुक्त (झो.नि.पु.)
२६. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
२७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
२८. मा.शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
२९. मा.सुनिल केसरी, उप आयुक्त (परिमंडळ क्र.१)
३०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (परिमंडळ क्र.२)
३१. मा.मधुकांत गरड, उप आयुक्त (परिमंडळ क्र.३)
३२. मा.सुरेश जगताप, उप आयुक्त (परिमंडळ क्र.४)
३३. मा.सुरेश जगताप, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन)
३४. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
३५. मा.युवराज देशमुख,कार्य.अभियंता (पथ)
३६. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत)
३७. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
३८. मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ)
३९. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता(व्हे.डेपो.)
४०. मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प)
४१. मा.संदीप खांदवे, कार्य.अभि.(भवन)
४२. मा.शाम ढवळे, अधीक्षक अभियंता (हरिटेज)
४३. मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी
४४. मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक)
४५. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
४६. मा.गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
४७. मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख
४८. मा.मदन आढारी,अधी.अभि.(पा.पु.)
४९. मा.भोसेकर, प्र.उप आयुक्त, सुरक्षा रक्षकप्रमुख
५०. मा.राजेंद्र मदने (पी.एम.पी.एम.एल.)

# पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती सभा
## कार्यपत्रिका क्र.४८, दि.९/२/२०१६
## सभा क्र.७९,दि.९/२/२०१६ चा वृत्तांत

मा.अध्यक्षा–श्रध्दाजंली वाहू या.

**लोकसभेचे माजी सभापती बलराम जाखड यांचे निधन झाले प्रसिध्द शायर, गीतकार निदाफ हाजली यांचे निधन झाले त्यांना श्रध्दाजंली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे उभे रहावे.**

मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी.

**दाखल विषय क्रमांक :– २२९५/ठराव क्र.२२९९**

प्रभाग क्र.६८ मधील पर्वती स.नं.९२/९३ येथे लक्ष्मीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू. ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सुभाष जगताप व मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २२९६/ठराव क्र.२३००**

प्रभाग क्र.६८ मधील पर्वती स.नं.९२/९३ लक्ष्मीनगर येथे पावसाळी लाईन टाकणेसाठी र.रू.३५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सुभाष जगताप व मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–काय आहे?

मा.अध्यक्षा–त्यांच्या स यादीतील वर्गीकरणे आहेत.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २२९७/ठराव क्र.२३०१**

प्रभाग क्र.६८ मधील लक्ष्मीनगर शाहू वसाहत येथे पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रू. १५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सुभाष जगताप व मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :–२२९८/ठराव क्र.२३०२**

प्रभात क्र. ६५ मध्ये लोहियानगर येथे झोपडपट्टी धारकांकरिता एस.आर.ए. प्रकल्प सुरू आहे. सदर ठिकाणी राहत असलेल्या झोपडपट्टी धारकांना तात्पुरत्या स्वरूपामध्ये पुणे म.न.पा. मालकीच्या स.नं. ५३९ सि.टी.एस. १५४, घोरपडे पेठ येथील ट्रॅझिट कॅम्पमध्ये स्थलांतर करून भाडयाने पत्र्याचे शेड देण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी एस.आर.ए. प्रकल्प होण्याकरिता अजून काही कालावधी आहे.

तरी झोपडपट्टी धारकांना तात्पुरत्या स्वरूपामध्ये पुणे म.न.पा.च्या मालकीच्या स.नं. ५३९ सि.टी.एस. १५४, घोरपडे पेठ येथील ट्रॅझिट कॅम्पमध्ये दिलेल्या एकूण २६२ पत्र्याचे शेडची मुदत अजुन ५ वर्षे वाढविण्यास व पुढील ५ वर्षांचे भाडे वसूल करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.गणेश बिडकर यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्षा–येथे एस.आर.अे.चा प्रकल्प आहे आणि अद्याप तो पूर्ण व्हायचा आहे.

मा.अविनाश बागवे–याठिकाणी मनपाने ट्रान्झिस्ट कॅम्प केला असून तो रहिवाशांसाठी आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तेथे मोकळी जागा होती.

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा आपल्याला जरी काही वाटले तरी याबद्दल मा.बापू कांबळे यांचेसह चर्चा करता येईल.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २२९९/ठराव क्र.२३०३**

प्रभाग क्र. २० अ मधील मुंढवा भाजी मार्केटचे उर्वरित काम पूर्ण करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.चंचला कोद्रे व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३००/ठराव क्र.२३०४**

प्रभाग क्र.२ ब मध्ये कचरा व्यवस्थापनासाठी कॉम्पॅक्टरसाठी चासी खरेदी करणेसाठी र.रू. २५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.संजिला पठारे व मा.महेंद्र पठारे यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.

उपनगरसचिव-हे स यादीतील आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.

**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३०१/ठराव क्र.२३०५**

प्रभाग क्र.१९ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.सुमन पठारे व मा.महेंद्र पठारे यांचे दि. ८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.

मा.मुकारी आण्णा आलगुडे-ही स यादी आहे का?

मा.शंकर केमसे, सभागृहनेते-होय, हा विषय मान्य करावा.

**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३०२/ठराव क्र.२३०६**

मराठी चित्रपटसृष्टीतील थोर कलावंत व चित्रकार सुर्यकांत मांढरे यांच्या कलाकृती व स्मृती जतन करण्यासाठी आण्णाभाऊ साठे स्मारक येथील रिकाम्या हॉलमधील एका भागात कै.सुर्यकांत मांढरे दालन उभारण्यास तसेच त्यासाठी अत्यावश्यक अंतर्गत सुशोभिकरणाची कामे महानगरपालिकेने हाती घेवून सुशोभित कलादालन निर्माण करुन थोर कलावंत सुर्यकांत मांढरे यांची स्मृती जतन करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.शारदा ओरसे व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.अविनाश बागवे-हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्षा-आपण उद्यान खात्याने कोणता करारनामा केला होता? याबाबत माहिती द्यावी. आपण तिथे त्यांचे कलादालन केले होते ते पाडले आणि आता तिथे काय केले आहे?

मा.घोरपडे, उद्यान अधीक्षक-मा.अध्यक्षा, आता माझ्याकडे करारनाम्याची प्रत नाही.

मा.अध्यक्षा-ती मागवून घ्यावी.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-आपण एक लक्षात घ्या की, आपण तेव्हा चर्चा केली होती की, आपल्याला हा विषय मान्य करून घ्यायचा आहे आणि तेव्हा तुम्ही या विषयाची माहिती देतो असे सांगितले होते. मांढरे परिवारातील सदस्य, ज्यांच्या बरोबर आपण करार केला होता ते समक्ष सुध्दा आले होते. परंतु आपण ती माहिती आणलीच नाही, असे म्हणणे योग्य होत नाही.

मा.घोरपडे, उद्यान अधीक्षक-मा.अध्यक्षा, तेथील कलादालनाचे बांधकाम गार्डन डिपार्टमेंटकडून झालेले आहे आणि सदरचा करारनामा मा.झुरमुरे साहेबांनी केला होता परंतु त्यावर कोणत्याही स्वाक्षऱ्या नव्हत्या. त्यामुळे मला करारनाम्याची मूळ फाईल पहावी लागेल. मी याबाबत माहिती घेतली परंतु ती फाईल व्यवस्थापक यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे, असे समजले आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-मा.घोरपडे साहेब तुमच्या लक्षात आले पाहिजे की, सूर्यकांत मांढरे सारखा मोठा सिनेकलावंत आणि लेखक या सगळ्या बाबी लक्षात घेतल्या पाहिजे होत्या परंतु आपण ते सगळे प्रदर्शन साहित्य एकत्र घेउन कुठेतरी बांधून ठेवले आहे.

मा.घोरपडे, उद्यान अधीक्षक-ते गार्डन डिपार्टमेंटकडून झालेले नाही. ते काम उप आयुक्त (तां) यांच्याकडून झाले आहे. अशाने तो विषय मार्गी लागणार नाही. त्या करारनाम्याची प्रत..

मा.अध्यक्षा-मी करारनाम्याचे फोटो काढून ठेवले आहेत. त्यांची मिसेस व चिरंजीव आपल्याकडे आले होते. आपण त्यांच्या बरोबर काहीतरी लेखी करार केलेला आहे आणि ते तुमच्या मागे लागले नव्हते की, आमचे प्रदर्शन साहित्य घ्या. ते साहित्य तुम्ही मागून घेतले होते आणि त्या साहित्याला कोणते सरंक्षण द्यायचे? याबाबत तुम्ही लेखी दिलेले आहे आणि ते सरंक्षण न देता तुम्ही अशा पध्दतीने भुलभुलय्या करू शकता का? आणि त्यांची जी काही प्रॉपर्टी आहे. त्यांना जे काही राष्ट्रपती पुरस्कार मिळाले आहेत. त्या पुरस्कारांची सुध्दा वाताहत करून टाकली आहे. ही बाब गंभीर आहे आणि त्यांनी ज्या ज्यावेळी त्यांनी न्याय मागण्याचा प्रयत्न केला तेव्हा तुम्ही त्यांना अपमानास्पद वागणूक दिली आहे. ते मा.आयुक्त साहेबांकडे गेले तरी त्यांची दखल घेतली गेली नाही. वास्तविक पाहता तुम्ही आता असे केले पाहिजे की, तिथे आता जे काही आहे ते काढले पाहिजे आणि पुन्हा होते तसे ते प्रस्थापित केले पाहिजे.

मा.घोरपडे, उद्यान अधीक्षक-मॅडम ते काम गार्डन डिपार्टमेंटकडून झालेले नाही.

मा.अध्यक्षा-हा कराराच उद्यान अधीक्षक यांच्या बरोबर झाला आहे.

मा.घोरपडे, उद्यान अधीक्षक-करारनामा झाला होता आणि त्यानंतर तेथील इमारत व्यवस्थापनाकडे हॅण्ड ओव्हर केली आहे.

मा.अध्यक्षा-याबाबत मा.कुलकर्णी साहेबांनी माहिती द्यावी.

मा.सतिश कुलकर्णी,उप आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन)-स्व.सूर्यकांत मांढरे यांना मिळालेल्या ट्रॉफीज व चलचित्रे इ.जे काही होते त्याबाबतचा करारनामा आमच्याबरोबर झालेला नाही. हे जे काही साहित्य होते नंतर ते काढून दुसऱ्या मजल्यावर ठेवले

आणि तिथे भुलभुलय्या तयार केला आहे. परंतु तेथे भूमी जिंदगी विभागाकडून काहीच झालेले नाही. परंतु त्यांना आता पर्यायी जागा कोणती द्यायची या दृष्टीने काही प्रयत्न झालेले आहेत.
मा.अध्यक्षा–परंतु, आपण त्याठिकाणी हे करावे म्हणून लेखी करार केलेला आहे. माझ्या प्रभागामध्ये प्रशासनाने मला न विचारता हे असे केले कसे?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–होय, असा विषय होऊ शकतो.
मा.अध्यक्षा–या प्रकाराची फार वरिष्ठ पातळीवर दखल घेतली गेली आणि फार गंभीर बाब आहे. ते आपल्या महाराष्ट्राचे भूषण आहेत त्यांना एवढे पुरस्कार मिळाले होते आणि ते पुरस्कार सुध्दा इकडे तिकडे टाकून दिलेले आहेत. तुम्ही जर ते काढले असेल तर नीट ठेवायला नको का? एवढा अवमान करायचा का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे मराठी कलावंताचा अपमान केल्यासारखेच झाले.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यांनी अपमान तर केलाच आहे आणि पुन्हा नवीन ठिकाणी केल्यानंतर पुन्हा असेच करू शकतील, यांनी त्यांच्या मनाला येईल तसे करायचे ठरविले आणि यावर कोणाचे नियंत्रण राहणार?
मा.अध्यक्षा–ते पुन्हा जेथे होते तेथेच करावे.
मा.अनिल राणे–ते उद्यान खात्याने केलेले नाही.
मा.अध्यक्षा–लिहून देणार आणि लिहून घेणार यामध्ये उद्यान अधीक्षकांच्या नावे करारनामा केला आहे आणि त्यावर मा.झुरमुरे साहेबांचे नाव आहे.
मा.श्रीकांत जगताप–या वास्तूची देखभाल करण्याची जबाबदारी कोणावर होती?
मा.अध्यक्षा–ते उद्यानामध्ये आहे म्हणून त्यांची जबाबदारी आहे.
मा.घोरपडे, उद्यान अधीक्षक–ती इमारत जरी गार्डन डिपार्टमेंटकडून बांधलेली असेल तरी पूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी ही बालगंधर्वचे व्यवस्थापक श्री.कुमावत यांच्याकडे आहे.
मा.श्रीकांत जगताप–श्री.कुमावत साहेब, उपस्थित आहेत का?
मा.अध्यक्षा–अण्णाभाऊ साठे कलादालनामध्ये स्व.सूर्यकांत मांढरे यांच्या प्रदर्शनासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करून ते सन्मानपूर्वक तिथे प्रस्थापित करा आणि ते काम सुरू करा.
मा.अविनाश बागवे–आता हे काम भवन विभागामार्फत होईल.
मा.अध्यक्षा–भवन विभागाने हे काम व्यवस्थित सुरू करावे. सदरचा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३०३/ठराव क्र.२३०७**

प्रभाग क्र. ५६ अ व ३६ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १.३० कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.राहुल तुपेरे व मा.अनिल राणे यांचे दि. ९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३०४/ठराव क्र.२३०८**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात येणा–या विविध सांस्कृतिक कार्यक्रमप्रसंगी मंडप उभारणे, विद्युत विषयक तात्पुरती कामे करणे, पुणे महापौर चषकासाठी कमी पडणारी रक्कम यासाठी र.रू. ८० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी, मा.मुकारी अलगुडे व मा.अविनाश बागवे यांचे दि. ९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३०५/ठराव क्र.२३०९**

प्रभाग क्र.४९ ब मध्ये घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत घंटा टीपर बांधणेसाठी भारत आय व्ही प्रदूषण मानांकन असलेली तीन चासीज खरेदी करणेसाठी र.रू. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.मिलिंद काची व मा.अविनाश बागवे यांचे दि. ९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३०६/ठराव क्र.२३१०**

प्रभाग क्र.६ बोपोडी येथील नेत्र हॉस्पिटल मध्ये विविध विद्युत विषयक विकास कामे, भुमिगत केबल टाकणे, दुरुस्तीची व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रू. ७५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि. ९/२/२०१६ चे पत्र.
मा.अध्यक्षा– हा विषय मान्य करावा. हे स यादीतील आहे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३०७/ठराव क्र.२३११**

पुण्यातील आबेदा इनामदार कॉलेजच्या १४ विद्यार्थ्यांचा मुरूडच्या समुद्रात बुडून मृत्यू झाला. या मृत्यूमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून प्रत्येकी र.रू.१ लाख प्रमाणे एकूण र.रू.१४ लाखाचे सहाय्य करण्यात यावे व सदरचे सहाय्य हे सन २०१५–१६ च्या अंदाजपत्रकातील योजनेतर खर्च तपशिल, पान क्र.४८ वरील थ. नागरिक संरक्षण व पूर संरक्षण योजना, थ१. नैसर्गिक आपत्तीग्रस्त / अपघात–ग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत तरतूद र.रू.२०,४०,०००/– या तरतूदीतून देण्यास मान्यता मा.शंकर केमसे, सभासगृह नेता, मा.दिपक बोडके, मा. राजेंद्र वागसकर, मा.अशोक हरणावळ, मा.उल्हास उर्फ आबा बागुल, उपमहापौर, मा.सौ.अश्विनी कदम, अध्यक्षा, स्थायी समिती, मा.गणेश बिडकर, मा.अरविंद शिंदे, विरोधी पक्षनेता, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि.५/२/२०१६ व दि.६/२/२०१६ चे पत्रावर झालला मा. पक्षनेते सभेचा दि. ८/२/२०१६ रोजीचा निर्णय विचारासाठी.

उपनगरसचिव–हा प्रस्ताव मा.पक्षनेते सभेकडून आला आहे.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा सर्वपक्षीय ठराव आहे. हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–हे देणार आहात का? कधी देणार आहात?

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आम्ही हे देणार आहोत.

मा.अविनाश बागवे–हे पैसे कशातून काढणार आहात?

उपनगरसचिव–पान क्र.४८, थ.नागरीक संरक्षण मध्ये आहे.

मा.अध्यक्षा–आपत्ती व्यवस्थापनामध्ये निधी आहे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.१५.०१

**दाखल विषय क्रमांक :– २३०८/ठराव क्र.२३१२**

मौजे गुलटेकडी, ता.पुणे शहर, जि.पुणे येथील फा.प्लॉट नं.४३८, सब प्लॉट नं.१,२,३,८ व ९ या गार्डनसाठी आरक्षित जागा भूसंपादन करणेकरिता पुणे महानगरपालिकेने निश्चित केलेली रक्कम रु.१८,८३,८८,०८९/– यापुर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रु.६,५०,४०,०००/– वजा जाता ऊर्वरित रक्कम रु.१२,३३,४८,०८९/– भरणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१०५५ दि.४/२/२०१६ चे पत्र.

१)मौजे गुलटेकडी, ता.पुणे शहर, जि.पुणे येथील फा.प्लॉट नं.४३८, सब प्लॉट नं.१,२,३,८ व ९ या गार्डनसाठी आरक्षित जागा भूसंपादन करणेकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई (रिट पिटीशन क्र.११२५७/२०१२) यांचे दि.८/१०/२०१५ चे आदेशानुसार मा. महा. आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती व याकरिता मा.जिल्हा न्यायालयात दाखल भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१६२/२०१५ व अवमान याचिका क्र.३२७९१/२०१५ विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेने निश्चित केलेली रक्कम रु.१८,८३,८८,०८९/– यापुर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रु.६,५०,४०,०००/– वजा जाता ऊर्वरित रक्कम रु.१२,३३,४८,०८९/– नुकसान भरपाईपोटी भरणेस मान्यता मिळणेस.

२) मा.जिल्हा न्यायालयामध्ये दाखल भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.१६२/२०१५ करिता मा.उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश अथवा वरिष्ठ वकिल यांची नियुक्ती विधी विभागामार्फत करणेस व त्याकरिता आवश्यक मुशाहिरा अदा करणेस मान्यता मिळणेस.

३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल अवमान याचिका C.P.ST क्र.३२७९१/२०१५ व अवमान याचिका क्र.५३४/२०१५ यामध्ये उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतर्फे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे शपथपत्र दाखल करणेस.

मा.अविनाश बागवे–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.

मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–मा.अध्यक्षा महोदया, मौजे गुलटेकडी फा.प्लॉट नं.४३८ या जागेवर १९८७ च्या डी.पी.मध्ये गार्डनचे आरक्षण होते.

मा.अविनाश बागवे–आपल्याकडे दरवर्षी तरतूद असतेच मग आपण प्रत्येक विषयासाठी मान्यता घेतो का?

मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–मान्यता घेण्याचे कारण असे आहे की, २२ डिसेंबर २०१४ रोजी ॲवार्ड डिक्लेअर झाला आहे. तो ॲवार्ड ७१ कोटी रू.चा झाला होता. एवढ्या मोठ्या रक्कमेचा ॲवार्ड आपल्याला मान्य नव्हता. त्यामुळे आपण मा.जिल्हाधिकाऱ्याकडे रिर्टन फाईल केले होते. त्याचप्रमाणे आपण हायकोर्टामध्ये रिटपिटीशन दाखल केले आहे की, आमच्या हिशोबाप्रमाणे व माहितीप्रमाणे हे ॲवार्ड १८ कोटी रू.एवढेच होते आणि त्याच्या अगेन्स्ट ते ७१ कोटी रू.चे झालेले आहे. ही रक्कम जास्त झाल्यामुळे याचे व्हॅल्युऐशन पुन्हा झाले पाहिजे याकरीता आपण हायकोर्टामध्ये रिटपिटीशन दाखल केले होते आणि हायकोर्टाने दि.८ ऑक्टोंबर २०१५ रोजी रिटपिटीशन मध्ये निर्णय दिला आहे की, तुमच्या म्हणण्याप्रमाणे १८ कोटी रू.व्हॅल्यूऐशन होत असेल तर उर्वरित १२ कोटी रू.शासनाकडे जमा करावेत. तुम्ही त्या जागेचा ताबा घ्यावा. ती जागा साधारणत: ६३०० चौ.मी.आहे. या जागेचे संरक्षण मनपा करेल. तिथे मनपा गार्डन डेव्हलप करेल आणि त्या दरम्यान जमीन मालक, राजू संगतानी यांनी इथे डिस्ट्रीक कोर्टामध्ये जुना भूसंपादन कायदा, सेक्शन १८ प्रमाणे, लॅण्ड रेफरन्स दाखल केला होता म्हणजे वाढीव नुकसान भरपाईची मागणी केली होती. ती वाढीव नुकसान भरपाईची मागणी, डिस्ट्रीक कोर्टाने एका वर्षाच्या आत दि.३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत कोर्टाने डिसाईड करणे आवश्यक आहे आणि त्यानंतर जर लॅण्ड रेफरन्स मध्ये जर किंमत कमी जास्त झाली तर आमच्याकडील हायकोर्टातील पिटीशन आम्ही डिसेंबर २०१६ मध्ये बोर्डावर घेऊ आणि ॲडमिट करू, असे

कोर्टाचे निर्णय होते आणि लॅण्ड रेफरन्स मध्ये त्या जमीन मालकाने ७१ कोटी रू.च्या अगेन्स्ट २४२ कोटी रू.इतकी मागितलेली आहे. त्यामुळे आता आपण हायकोर्टात रिटपिटीशनला गेलेलो असताना जर लॅण्ड रेफरन्स मध्ये जर दावा आपल्या विरोधात गेला तर भविष्यात एवढी रक्कम भरावी लागेल, अशी आम्हाला भीती वाटते आणि त्या पध्दतीने आपल्या हायकोर्टाचे जे वकील होते त्यांनी ही बाब मा.स्थायी समितीच्या निदर्शनांस आणून द्यावी आणि मग तुम्ही हे १२ कोटी रू.शासनाकडे किंवा कोर्टाकडे भरा असे सांगितले म्हणून आपण हा विषय इथे आणलेला आहे.
मा.अविनाश बागवे–हायकोर्टाचा निर्णय कधी लागला?
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–ऑक्टोंबर २०१५ मध्ये निर्णय दिला.
मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेबांचे बजेट आता आले आहे. मा.आयुक्त साहेबांच्या बजेटमध्ये हे पैसे धरले आहेत का? जर हा गंभीर विषय आहे. कोर्टाचा निकाल आहे आणि आपल्याला शासनाकडे ७१ कोटी रू.च्या अगेन्स्ट १८ कोटी रू. भरण्याची तरतूद करा असे आपल्याला ऑक्टोंबर मध्ये कळविले होते मग प्रशासनाने त्यांच्या बजेटमध्ये ही तरतूद का केली नाही?
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–आमच्या खात्याकडे बजेट हेडला पैसे शिल्लक आहेत आणि त्यातून पैसे भरणार आहोत.
मा.अविनाश बागवे–मग हा विषय स्थायी समितीकडे का आणला आहे?
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–याकरीता की, डिस्ट्रीक कोर्टामध्ये जो लॅण्ड रेफरन्स आहे त्यामध्ये जमीन मालकाने २४२ कोटी रू.ची मागणी केलेली आहे. हायकोर्टामध्ये आपले जे वकील ॲड.साखरे, ॲड.कुलकर्णी आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, जर लॅण्ड रेफरन्सचा निकाल आपल्या विरोधात गेला, मनपाच्या विरोधात निकाल लागला तर आपल्याला लॅण्ड ॲक्वीझिशन मधून विड्रॉल करता येणार नाही. आपण ऑलरेडी ताबा घेतलेला असेल.
मा.अविनाश बागवे–आपल्याला २४२ कोटी रू.गरज लागणार नाही.
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–नाही, जर दावा जमीन मालकाच्या बाजूने लागला तर?
मा.अविनाश बागवे–हे महानगरपालिकेच्या हिताचे आहे का?
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–यामध्ये आपल्याला थोडीशी भीती आहे की, २४२ कोटी रू.एवढी मोठी रक्कम जर भविष्यात भरावी लागली तर त्यावेळेस काय करायचे? त्यावेळेस आपल्याला हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात जावे लागेल. ही वस्तुस्थिती राहू शकते.
मा.अविनाश बागवे–जागा मनपाच्या ताब्यात आली आहे का?
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–ती जागा ताब्यात घ्यायची आहे.
मा.सुभाष जगताप–पवार साहेब, तळजाईचा जो निकाल झाला आणि तो का फेटाळला की, आपण जे पैसे दिले ते शासनाकडे भरले.
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–होय.
मा.सुभाष जगताप–त्यावेळी सुप्रीम कोर्टाने असे सांगितले की, असे चालणार नाही. ते पैसे जमीन मालकाला द्यायचे आहेत. परंतु तुम्ही आता शासनाकडे पैसे भरण्याबद्दल सांगितले आहे.
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–बरोबर आहे.
मा.सुभाष जगताप–अजिबात नाही. हा सुप्रीम कोर्टाचे आताचा निकाल आहे आणि आपण शासनाकडे पैसे भरले म्हणून त्यांनी आपल्याविरूध्द निकाल दिला.
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–मी हायकोर्टाची ऑर्डर आपल्याला क्लेअर करतो की, तुम्ही हे पैसे शासनाकडे जमा करा. शासन मग एस.एल.ए.ओ., ४ आठवड्यांच्या आत जमीन मालकाला नोटीस देईल की, मनपाने शासनाकडे पैसे भरलेले आहेत आणि त्यानंतर ४ आठवड्याच्या आतमध्ये जमीन मालकाने मनपाला जागेचा ताबा द्यायचा आणि त्या कालावधी मध्ये तो १८ कोटी रू.विड्रॉल करेल, अशी कोर्टाची ऑर्डर आहे.
मा.सुभाष जगताप–तुम्ही यासाठी एक अधिकारी नेमणार, ४ आठवड्यांसाठी? त्यासाठी स्पेसिफिक अधिकारी नेमावा लागेल.
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–बरोबर
मा.सुभाष जगताप–नंतर त्याला जबाबदार धरले जाईल.
मा.अनिल पवार, उप आयुक्त(भूसंपादन)–होय, त्यांनी ही मा.जिल्हाधिकारी सो. यांना ऑर्डर केली आहे की, मनपाने पैसे दिल्यानंतर जमीन मालकाला तात्काळ पैसे द्या आणि त्याला पैसे विड्रॉल करू द्या. परंतु फक्त पैसे विड्रॉल करणे नव्हे तर त्याने जमीनीचा ताबा देणे सुध्दा आवश्यक राहील. मग आपण ते मेंटेन करणे त्यावरील अतिक्रमण रोखणे आणि डेव्हलप करणे. फक्त एवढेच आहे की, लॅण्ड रेफरन्सचा निर्णय जर विरोधात गेला तर आपल्याला आर्थिक भुर्दंड बसू शकतो.
मा.अविनाश बागवे–ठीक आहे हा विषय मान्य करू आणि नंतर जर आपल्या विरोधात निकाल गेला तर जागा परत देऊन टाकू, लॅण्ड ॲक्वीझिशन रद्द करून टाकू. २४२ कोटी रू.भुर्दंड कोण सहन करणार.
मा.शंकर केमसे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३०९/ठराव क्र.२३१३**

प्रभाग क्र. १० ब स.नं. १ते १३ सी.सी. रोड करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सिध्दीविनायक कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८०,४९,६३५/– पेक्षा २६.१% कमी) असल्याने

त्यांचेकडून र.रु.५९,४८,६८०=२६ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळेणबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०५६ दि.४/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१०/ठराव क्र.२३१४**

प्रभाग क्र. १३ ब संगमवाडी येथील रस्ते यु.टी.डब्ल्यु. टी. कॉंक्रिटीकरण व डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. बी. एन. चव्हाण यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४४,९९,९९८/– पेक्षा २५.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,४१,२४८=५२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळेणबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०५७ दि.४/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३११/ठराव क्र.२३१५**

घोरपडी स.नं.७०/६९ व स.नं.६७,६८ मधील १२ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले अॅण्ड कंपनी यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६८,१७,५२०/–पेक्षा ५.५५%कमी) असल्याने त्याचेंकडून र.रु.६४,३९,१४७=६४ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मु.अ.(प्र)/१०५८,दि.४/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१२/ठराव क्र.२३१६**

साधु वासवानी चौक ते कौन्सिल हॉल तसेच जी.पी.ओ. ते ब्लु नाईल हॉटेल रस्ता करणे (फेरटेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,९२०/– पेक्षा १७.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,३८,१९१=६० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०५९ दि.४/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१३/ठराव क्र.२३१७**

कार्यकारी अभियंता (पथ)क्र. ३ विभागातील औंध क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांवर अडथळा विरहित फुटपाथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सदानंद जोशी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,४७१/– पेक्षा २४.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,८४,५९९=५५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६० दि.४/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला

**दाखल विषय क्रमांक :– २३१४/ठराव क्र.२३१८**

सिंहगड रोड ते ना.सी. फडके चौक रस्ता मिलींग करून डांबरीकरण करणे (फेरटेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जॅगसन बिल्डकान यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,९८६/– पेक्षा ९.२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,०५,३४७=२८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६१ दि.४/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१५/ठराव क्र.२३१९**

प्रभाग क्र.४१ स.नं.५२/५३ डी.पी.रोड २४ मी.विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३४,९९,६१४/–पेक्षा १५.६९%कमी) असल्याने त्याचेंकडून र.रु.२९,५०,५२४=५६ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मु.अ.(प्र)/१०६२,दि.४/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१६/ठराव क्र.२३२०**

प्रभाग क्र. ११ अ मधील कपिला व कृषी सोसायटी परिसरात डांबरीकरण करणे तसेच प्रभाग क्र. ११ अ मधील कुसाळकर पुतळा चौक पत्रकारनगर पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२९,९९,९८२=७७ पेक्षा ४.९५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२३,५६,४८३=६२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६३ दि.४/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१७/ठराव क्र.२३२१**

प्रभाग क्र. १० ब मध्ये स.नं.११६ ते ११८ सी.सी. रोड करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,४३७/– पेक्षा २६.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,९४,५८३=९४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६४ दि.४/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१८/ठराव क्र.२३२२**

नविन होळकर जलकेंद्र अंतर्गत ४० द.लि. दिन क्षमतेची गाळणी विभाग चालविणे व पंपिंग स्टेशन चालविणे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदेश इलेक्ट्रीकल्स ॲन्ड् कॉन्ट्रक्टर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,५२,९२६=५९ पेक्षा ९.९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५३,५२,९२६=५९ (अधिक किमान वेतन कायदा, रजा वेतन, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा वर्गणी, बोनस इत्यादी कायद्यानुसार वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरक) पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पापु व मलनि(विद्युत)/१०६५ दि. ४/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३१९/ठराव क्र.२३२३**

पुणे पेठ घोरपडे येथील सि.स.नं. ५९७,५९८ व ५९६ घोरपडे पेठ मिळकतीच्या दक्षिणेकडील यापुर्वी कलम २१०(१)(अ) अन्वये आखलेली रस्तारुंदी प्रमाणरेषा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० (१)(ब) अन्वये रद्द करणेस व अस्तित्वातील रस्ता कायम ठेवण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूसंपादन/१०६६ दि. ४/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–हा विषय मान्य करावा.

मा.अविनाश बागवे–पुढे कनेक्टीव्ही नाही आणि यामध्ये जुन्या लोकांची घरे आणि वाडे जाणार आहेत त्यामुळे हा विषय मान्य करून हे रद्द करून टाका.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२०/ठराव क्र.२३२४**

स.नं.१४३,१७६ वडगाव खुर्द ते स.नं. १८०,१८२,१७९,१८१,१४८,१४९,१५०,१५१,१५२,१५३,१५४ धायरी सावित्री गार्डन ३० मीटर रूंदीचा रस्ता तयार करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमूर्ती स्टोन

मेटल कंपनी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९५,०२,१४०/– पेक्षा १६.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७९,६२,७९३=३२ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६७ दि.५/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२१/ठराव क्र.२३२५**

प्रभाग क्र. ५६ पु.ल. देशपांडे उद्यान ते जनता वसाहत मध्ये जाणारा रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.धनराज असफ्लाट कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,८२०/– पेक्षा १.% कमी (सुधारित)) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,८२१=८० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६८ दि.५/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२२/ठराव क्र.२३२६**

प्रभाग क्र. ८ ब औंध मुख्य रस्ते साईडपट्टा ग्राऊट करणे व ठिकठिकाणी पदचारी नविन फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोहिनी एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,९९,६२६/– पेक्षा १.००% कमी (सुधारित)) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,७२,६२९=७४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०६९ दि.५/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२३/ठराव क्र.२३२७**

पर्वती जलकेंद्र फिल्टर बेड विषयक व तद्अनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संताजी आर कदम यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५१,६१,९४१/– पेक्षा १६.४% कमी) असल्याने त्याचेंकडून र.रु.४३,१५,३८२=६८ पर्यत काम करून घेणेसाठी व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु./१०७४,दि.६/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२४/ठराव क्र.२३२८**

आंबेगाव स.नं.१७ ते २९ हा १८ मी.डी.पी.रस्ता हायवे पर्यत विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९९,९९,९७४/–पेक्षा ५%कमी) असल्याने त्याचेंकडून र.रु.९४,९९,९७५=३० पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७५,दि.६/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२५/ठराव क्र.२३२९**

टिळक रस्ता पुरम चौक ते हिराबाग चौक डांबरीकरण करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. त्रिमुर्ती स्टोन मेटल कं. यांचे एकच टेंडर आले ( टेंडर र.रू. २७,३५,९६४/– पेक्षा ८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २५,१७,०८६=८८ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मान्यता मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०७८ दि.८/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२६/ठराव क्र.२३३०**

लक्ष्मी रस्ता (लिंबराज महाराज चौक ते अलका टॉकिज) डांबरीकरण करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ४१,०३,७८९/– पेक्षा १.३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४०,५०,४३९=७४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०७९ दि.८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२७/ठराव क्र.२३३१**

स.नं. ३२ कात्रज येथील डी.पी.रस्ता विकसीत करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९८,९३८/– पेक्षा ६.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,११,५०४=३७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०८० दि.८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२८/ठराव क्र.२३३२**

कार्यकारी अभियंता क्र. ३ पथ विभाग यांचे कार्यक्षेत्रातील वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय यांचे विविध केबल कंपन्या व पुणे महानगरपालिके मार्फत केलेल्या खोदाईचे रिईनस्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदगुरु कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ९९,९९,९९२/– पेक्षा १९.८३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८०,१६,९९३=५९ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/१०८२, दि. ८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३२९/ठराव क्र.२३३३**

पथ विभागाकडील कार्यकारी अभियंता क्र.२ बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध ठिकाणी फुटपाथ विषयक व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. जयगणेश वाबळे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे(टेंडर र.रू. ४९,९९,९९७/– पेक्षा २२.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू.३८,६६,९९७=६७ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/१०८४, दि. ८/२/२०१६

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३०/ठराव क्र.२३२४**

प्रभाग क्र. ५० ब मध्ये माडीवाले कॉलनी श्री स्वामींचा मठ, खजीना विहिर परिसरातील रस्ते मिलिंग करून/खोदून डांबरीकरण करणे ( फेर टेंडर ) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रू. ३९,९९,८०५/– पेक्षा १.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३९,४६,६०७=५९ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/१०८५ दि.८/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३१/ठराव क्र.२३३५**

भिकारदास मारूती ते निंबाळकर तालिम चौक रस्ता व जोडरस्ते मिलिंग करून डांबरीकरण करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे( टेंडर र.रू. २७,३५,९६४/– पेक्षा १.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २६,९९,५७५=६७ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/१०८६, दि. ८/२/२०१६

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३२/ठराव क्र.२३३६**

हारमेस सोसायटी ते शास्त्री चौक (नगररस्ता कल्व्हर्ट) पर्यंत भुमिगत ड्रेनेज लाईन व पावसाळी लाईन टाकणे (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ऋतू एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९४,९९,५३५/– पेक्षा २१.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७४,१०,५८७=२५ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१०८७ दि.८/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३३/ठराव क्र.२३३७**

कामगार कल्याण विभागाकडील ट सल्लागार (कामगार) ६. कामगार कल्याण निधी मनपा वर्गणी या अर्थशिर्षिकावर मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य या अर्थशिर्षिकामधून र.रुपये १७,७१,९५०/– वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/एल. ओ./१०८८ दि.८/२/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–हे कशासाठी आहे?
उपनगरसचिव–सल्लागार (कामगार)कार्यालयाकडून, मयत सेवकांच्या वारसांना आर्थिक मदत देणेबाबतचा विषय आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३४/ठराव क्र.२३३८**

पुणे महानगरपालिकेच्या गंगाजळी निधीमध्ये नजिकच्या काळात उपलब्ध असलेली र.रुपये१४,५०,००,०००/– महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९२ अन्वये राष्ट्रीयकृत बँकेमध्ये १ वर्ष मुदतीसाठी गुंतविण्यास व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्वी मोकळी करणेस मा.महापालिका आयुक्त यांना अधिकार देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१०८९ दि. ८/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.
**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आज मान्य झालेले दाखलचे विषय १–के अंतर्गत घ्यावेत

**दाखल विषय क्रमांक :– २३३५/ठराव क्र.२३३९**

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालय येथील अंतर्गत व बाहयपरीसराची साफसफाई जंतुनाशकासह यांत्रिकी पध्दतीने करणे (टेंडर क्रमांक ५३ सन २०१५–२०१६) (बी–२ पध्दतीने) कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ६ निविदाधारकांपैकी दिशा एजन्सी यांनी दिलेला दर सर्वात कमी असल्याने यांचेकडून पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालय येथील (अंदाजे क्षेत्रफळ ८०,०००/–चौ.फुट) अंतर्गत व बाहयपरीसराची साफसफाई जंतुनाशकासह यांत्रिकी पध्दतीने प्रति महा सेवा करासह रक्कम रुपये ९,१३,७१०/–याप्रमाणे तीन महिन्या ऐवजी १२ महिन्या पर्यंत रक्कम रूपये १,०९,६४,५२०/–(अक्षरी रक्कम रूपये एक कोटी नऊ लाख चौसष्ट हजार पाचशे वीस फक्त) रकमेपर्यंत पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालय येथील अंतर्गत व बाहयपरीसराची साफसफाई जंतुनाशकासह यांत्रिकी पध्दतीने करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करण्यास आणि खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास व त्याप्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१६–२०१७ च्या अंदाजपत्रकातील कमला नेहरु रुग्णालय येथे विविध सेवकवर्ग ठेकेदारी पध्दतीने नेमणे RE17F140B मधून खर्च करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा.आयुक्त (इ) यांचे जा. क्र. मआ/आरोग्य/१०९०, दि.९/२/२०१६ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१५–२०१६, कमला नेहरु रुग्णालय व इतर रुग्णालय येथे विविध सेवक वर्ग ठेकेदारी पध्दतीने नेमणे, RE17F140B मान्य तरतुद रक्कम रुपये ३४,००,०००/–
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.अनिल राणे–मा.अध्यक्षा, या विषयाला आमची उपसूचना आहे की, हे काम दिशा संस्थेला देण्यात यावे.
उपनगरसचिव–या विषयाला उपसूचना आली आहे.

**उपसूचना**

**सूचक**–मा.अनिल राणे **अनुमोदक**–मा.राहूल तुपेरे

**दिशा एजन्सी यांचेकडून सदरचे काम ३ महिन्याऐवजी १२ महिने करून घेणेस व त्याप्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१६–१७ च्या अंदाजपत्रकातील कमला नेहरू रुग्णालय येथे विविध सेवकवर्ग ठेकेदारी पध्दतीने नेमणे** RE17F140 B **मधून खर्च करण्यात यावा.**
उपनगरसचिव–या उपसूचनेसह दुरूस्त प्रस्तावाला कोणाचा विरोध आहे का? यावर कोणाला बोलायचे आहे का?

मा.अध्यक्षा–हा विषय उपसूचनेसह मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून उपसूचनेसह मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३६/ठराव क्र.२३४०**

ओमकारेश्वर ते मुठेश्वर मंडळ ते नारायण पेठ पोलिस चौकी, चौक, रस्ता डांबरीकरण करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू.२७,३५,९६४/– पेक्षा १.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २६,९९,५७५=६७ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०९१ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३७/ठराव क्र.२३४१**

प्रभाग क्र. ३० अ मध्ये अत्यंत खराब झालेले रस्ते डांबरीकरण करणे ( फेर टेंडर ) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. त्रिमुर्ती स्टोन मेटल कं. यांचे एकच टेंडर आले ( टेंडर र.रू. ४९,९९,८२०/– पेक्षा ३.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४८,१९,८२६=४८ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०९२ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३८/ठराव क्र.२३४२**

खडकी रेल्वे स्टेशन येथे पादचारी पूल बांधणे या कामातील उर्वरीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सचिन फॅब्रिकेशन यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे( टेंडर र. रू. ६७,३७,९२१/– पेक्षा ७% जास्त( सुधारीत दराने)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७२,०९,५७५=४७ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र.मआ/मुअ(प्र.)/१०९३ दि.९/२/२०१६ चे पत्र.देण्यात येत आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३३९/ठराव क्र.२३४३**

लक्ष्मीनारायण टॉकीझ ते मित्र मंडळ चौक, मित्र मंडळ कॉलनी व अण्णाभाऊ साठे पुतळा ते पुरम चौक रस्ता पुर्नडांबरीकरण करणे ( फेर टेंडर ) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. त्रिमुर्ती स्टोन मेटल कं. यांचे एकच टेंडर आले ( टेंडर र.रू. ६९,९९,७३६/– पेक्षा ०.८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६९,४३,७३८=११ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०९४ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३४०/ठराव क्र.२३४४**

पुणे शहरातील डी.पी. रस्त्याचे प्रत्यक्ष जागेवर मान्य विकास आराखड्यानुसार आखणी करणे, रस्त्याचे भूसंपादन करणे व तद्नुषंगिक कामे करणे (बी २ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. चेतक इंजिनिअर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रू. ६३,२०,०००/– पर्यत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पथ/१०९५ दि.९/२/२०१६ चे पत्र.देण्यात येत आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
मा.अविनाश बागवे–हे कोणत्या विभागाचे टेंडर आहे?
उपनगरसचिव–हे पथ विभागाचे आहे.
मा.अविनाश बागवे–पथच्या बाबतीत सध्या किती चालू आहे की, कागदपत्रे दाखवा आज त्या विभागाचे अधिकारी उपस्थित नाहीत. मा.गरड साहेब सुध्दा मिटींगला येत नाहीत. ते ३ ते ४ महिने मिटींगला सुध्दा येत नाहीत. त्यांच्याकडील कारवाई संदर्भात चर्चा झाली होती.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–आज राऊत्त साहेब प्रकृती ठीक नसल्याने अनुपस्थित आहेत. परंतु हे टेंडर आहे हे मान्य करून मग चर्चा करू.

मा.अविनाश बागवे–आज अतिक्रमणचे प्रमुख श्री.माधव जगताप सुध्दा अनुपस्थित आहेत.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–पथ विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून खुलासा करायला सांगावे.
मा.अविनाश बागवे–आमच्या प्रश्नाच्या संदर्भात मा.आयुक्त साहेब स्वत: असे म्हंटले होते मी दोन दिवसात कारवाई करतो. मा.बकोरिया साहेब, आमच्या प्रभागातील दोन विषय होते एक अतिक्रमणचा विषय होता आणि तीन ते चार वेळेस पाठपुरावा केला आहे ते काम सुध्दा होत नाही. तसेच दारूच्या दुकानावरील कारवाईचा विषय आहे त्याबाबतची कागदपत्रे हवी आहेत, ती सुध्दा अद्याप दाखवित नाहीत. हे नक्की काय आहे? प्रशासनाने असे ठरविले आहे का? सामाजिक कार्यकर्ते, एन.जी.ओ., कंपन्या यांनाच फक्त टिव्टर आणि फेसबुक वरून मेसेज करायचे आणि त्यांचे क्युरीज सोडवायच्या असे ठरविले आहे का?
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–सबंधीत अधिकाऱ्यांना बोलावून हे प्रश्न मार्गी लावावेत.
मा.अविनाश बागवे–मा.स्थायी समितीच्या ५ सभांमध्ये बोलून सुध्दा विषय होत नसतील तर आम्ही काय केले पाहिजे? हे सांगा.
मा.शंकर केमसे–एक विषय शिल्लक ठेवू त्यावेळी संबंधीत अधिकाऱ्यांना बोलावून घ्यावे. हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३४१/ठराव क्र.२३४५**

प्रभाग क्र. १० ब स.नं. १ ते ४ सी.सी. करणे (पाषाण गावठाण येथील सहदेव कुटिर रूग्णालय समोरिल रस्ता सी.सी. करणे) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोतीलाल धुत सँड ॲण्ड स्टोन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रू. ७५,९९,९२०/– पेक्षा२३.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५८,२६,८५८=६६ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०९६ दि.९/२/२०१६ चे पत्र.देण्यात येत आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३४२/ठराव क्र.२३४६**

प्रभाग क्र. २४ मध्ये आपटे रस्ता टी.डब्ल्यू.टी. ओव्हर ले पध्दतीने काँक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. मोतीलाल धूत सॅण्ड ॲण्ड स्टोन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रू. १,२८,२४,९९६/– पेक्षा २३.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ९८,३२,९२४=४३ पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०९७ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३४३/ठराव क्र.२३४७**

प्रभाग क्र. ६७ अ मधील तावरे कॉलनी व आजुबाजुच्या परिसरातील रस्ते यु. टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने काँक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार एस. साठे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र. रू. ९९,९९,९९५/– पेक्षा २४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७५,९९,९९६=२० पर्यत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/१०९८ दि.९/२/२०१६ चे पत्र.देण्यात येत आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३४४ /ठराव क्र.२३४८**

राजीव गांधी उद्यान येथील श्री हरी सोसायटी येथील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.डेक्कन एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३६,९७,०६७/– पेक्षा २२% कमी असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,८३,७१२=२६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१०९९ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३४५/ठराव क्र.२३४९**

पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थेकरीता कचरा वाहण्यासाठी ढकलगाडे स्पेसिफिकेशननुसार तयार करून जसजसे लागतील तसतसे आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने पुरविणे (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार मे.शिल्पी इंजिनिअरींग वर्क्स, नागपूर यांचे कडून प्रती नग रु. १३,७७०/–

याप्रमाणे १४०४ नग एकूण रक्कम रु.१,९३,३३,०८०/-, मे.पायल इंडस्ट्रीज, पुणे यांचेकडून प्रती नग रू.१३,७७०/- या दराने ११०० नग एकूण रु.१,५१,४७,०००/- व मे.गुरूसाई एंटरप्रायझेस, पुणे यांचेकडून प्रती नग रू. १३,७७०/- या दराने ४०० नग एकूण रु.५५,०८,०००/- अशी एकूण २९०४ नगाकरीता एकूण रु.३,९९,८८,०८०/- पर्यंत खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११०० दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
मा.अविनाश बागवे-स्वच्छ संस्थेला आवश्यकतेनुसार म्हणजे काय? आपण आधी सुध्दा ढकलगाड्यांसाठी टेंडर काढले होते.
मा.सुरेश जगताप,उप आयुक्त(घ.क.व्य.)-सर, ते स्वच्छसाठी नव्हते पुशकार्ड ढकलगाड्या होत्या.
मा.अनिल राणे-त्यांचे काम कधी सुरू होणार आहे?
मा.सुरेश जगताप,उप आयुक्त(घ.क.व्य.)-सुरू झाले आहे आणि आता वॉर्डवाईज करण्याचे काम चालू आहे.
मा.अविनाश बागवे-आपण त्यांचे त्यांना साहित्य देणे, पैसे देणे हे प्रस्ताव मान्य केले आहेत. हे सगळे केले आणि प्रॅक्टकली काम कधी चालू होणार आहे?
मा.अनिल राणे-त्यांचा सगळा सेट अप तयार असल्याचे सांगितले होते.
मा.अविनाश बागवे-सर, महिना ते दीड महिना होऊन गेला आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-त्यांना एकदा आमच्या स्थायी समिती समोर बोलवावे.
मा.अनिल राणे-आपण ऑगस्ट मध्ये त्यांचा विषय मान्य केला आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-पुढील सभेत स्वच्छ संस्थेच्या लोकांना बोलवावे.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३४६/ठराव क्र.२३५०**

खजिना विहिर चौक ते नागनाथपार व परिसरातील रस्ते मिलिंग करुन डांबरीकरण करणे (फेर टेंडर) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.टी.जी.धमाणी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१९,९८६/- पेक्षा १.३३% कमी असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,७४,५००=१८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०१ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३४७/ठराव क्र.२३५१**

प्रभाग क्र. ४१ बी.टी.कवडे आर.ओ.बी. ते कवडे मळा रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,३४४/- पेक्षा १६.५९% कमी असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,३५,८५२=८३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/११०२ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३४८/ठराव क्र.२३५२**

पत्रकारनगर ते कुसाळकर पुतळ्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५६,५९,९९३=१४ पेक्षा १% कमी सुधारीत) असल्याने त्यांचेकडून र.रु.५६,०३,३९३=२० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०३ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते-हा विषय मान्य करावा.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :- २३४९/ठराव क्र.२३५३**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११०४ दि. ९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे-याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.
**निर्णय**-सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५०/ठराव क्र.२३५४**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११०५ दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५१/ठराव क्र.२३५५**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११०६ दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५२/ठराव क्र.२३५६**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११०७ दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५३/ठराव क्र.२३५७**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११०८ दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५४/ठराव क्र.२३५८**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११०९ दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५५/ठराव क्र.२३५९**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१११० दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५६/ ठराव क्र.२३६०**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/११११ दि. ९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**निर्णय**–सदर विषयाबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात येत आहेत.

**दाखल विषय क्रमांक :– २३५७/ठराव क्र.२३६१**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी DOOR TO DOOR SEGREGATED GARBAGAE COLLECTION BY PRIMARY AND SECONDARY TRANSPORTATION BY 7 TON GVW AND 1.5 TON GVW CAPACITY BELL TIPPER/TRUCK & TRANSPORTATION TO TRANSFER STATIONS, SWM PROJECT WITH OPERATION & MAINTENANCE OF PMC'S OWN AND CONTRACTORS VEHICLES FOR 3+2 YEARS (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून सदरचे काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१११२ दि.९/२/२०१६ चे पत्र.

१. मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून खालील तक्त्यात नमूद केलेल्या दरानुसार पुणे मनपा मोटार वाहन विभागाकडून पुरविण्यात आलेल्या वाहनांकरीता तसेच ठेकेदाराकडून घेण्यात येणाऱ्या वाहनांकरीता प्रत्यक्ष कामापोटी प्रथम वर्षासाठी रक्कम रु.१५,००,००,०००/– (अक्षरी रक्कम रु.पंधरा कोटी फक्त) अगर होणाऱ्या प्रत्यक्ष रक्कमेपर्यंत तसेच

त्यापुढील दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाकरीता होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्याकामी मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेबरोबर करारनामा करणेस.

**PART 1**
**Price bid for PMC's Vehicle**

| Vehicle type | No. of Trips ( Per Day Per Bell Truck) | Rate In Rs. per Month/ per Vehicle for operation & maintenance | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | First Year | Second Year | Third Year | Forth Year | Fifth Year |
| TATA 407 / TATA 709 / TATA 712 | 2 Trips | 1,20,000/- | 1,30,800/- | 1,45,188/- | 1,61,200/- | 1,75,700/- |
| | 3 Trips | 1,35,000/- | 1,47,150/- | 1,63,336/- | 1,81,000/- | 1,97,290/- |
| TATA ACE/ MAXIMO/ BOLERO MAXI TRUCK | 4 Trips | 75,000/- | 81,750/- | 90,742/- | 1,01,000/- | 1,10,090/- |
| | 5 Trips | 85,000/- | 92,650/- | 1,02,840/- | 1,14,200/- | 1,24,478/- |
| PIAGGIO APE | 4 Trips | 65,000/- | 70,850/- | 78,.643/- | 87,300/- | 95,157/- |
| | 5 Trips | 71,000/- | 77,390/- | 85,902/- | 95,350/- | 1,03,930/- |

**PART 2**
**Price bid for Contractor's Own Vehicle**

| Vehicle type | No. of Trips ( Per Day Per Bell Truck) | Rate In Rs. per Month/ per Vehicle for operation & maintenance | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | First Year | Second Year | Third Year | Forth Year | Fifth Year |
| 1.5 M.T. GVW | 4 Trips | 85,000/- | 92,650/- | 1,02,840/- | 1,14,200/- | 1,24,478/- |
| | 5 Trips | 91,000/- | 99,190/- | 1,10,100/- | 1,22,211/- | 1,33,209/- |
| 7 M.T. GVW | 2 Trips | 1,42,000/- | 1,54,780/- | 1,71,800/- | 1,90,000/- | 2,07,100/- |
| | 3 Trips | 1,55,000/- | 1,68,950/- | 1,87,500/- | 1,99,900/- | 2,17,890/- |

१. पुणे महानगरपालिकेच्या मालकीची एकूण ६२ मोठी वाहने व २३ छोटी वाहने आवश्यकतेनुसार कमी अथवा जादा टेंडरदारास चालववयास देणेस व तसेच २९ मोठी वाहने व ५ छोटी वाहने ही टेंडरदाराकडून आवश्यकतेनुसार कमी अथवा जादा घेणेस.
२. मे. स्वयंभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून सदर तीन वर्षापर्यंतचे काम समाधानकारक झालेस त्यापुढील चौथ्या व पाचव्या या दोन वर्षासाठी त्यांचेकडून सदरचे काम करुन घेणेसाठी विषयपत्र मा.स्थायी समितीस अलाहिदा सादर करणेस.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३५८/ठराव क्र.२३६२**

पुणे मनपाच्या पथ विभाग व उद्यान विभागासाठी टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे टिपर खरेदी करणे (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. पंडित ऑटोमोटिव्ह प्रा.लि., पुणे यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून १ नग टिपरसाठी रक्कम रु.२६,३४,२५५/– (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस लाख चौतीस हजार दोनशे पंचावन्न फक्त) याप्रमाणे २ नग टिपरसाठी रक्कम रु.५२,६८,५१०/– (अक्षरी रक्कम रुपये बावण्ण लाख अड्डसष्ट हजार पाचशे दहा फक्त)पर्यंत सर्व करांसहीत त्यांचे दर पत्रकामधील सर्व अटी स्विकारून टेंडर अटी शर्तीचे अधीन राहून अनामत रक्कम व बयाणा रक्कम न घेता खरेदी करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१११३ दि.९/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३५९/ठराव क्र.२३६३**

पुणे मनपाच्या मोटारींना लागणारे टायर सेट खरेदी करणे (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. जे. के. टायर ॲन्ड इंडस्ट्रिज लि., पुणे यांचे एकच टेंडर आले असल्याने या टायर उत्पादक कंपनीकडून जसजसे लागतील तसतसे आवश्यकतेनुसार त्यांचेकडून खालील तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार टायर सेट एकूण रक्कम रूपये ६५,९८,६८२=५० पर्यंत सर्व करा सहीत त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी स्विकारुन, टेंडर अटी व शर्तीचे अधिन राहून टेंडर बयाणा रक्कम व अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस व त्यांचेबरोबर टेंडर अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१११४ दि.९/२/२०१६ चे पत्र.

| क्र. | टायर साईज | परिमाण (सेट) | दर प्रति टायर सेट रू. | आकार रूपये |
|---|---|---|---|---|
| 1 | Size 10.00*20-16 PR Highway Pattern Tyre Set | 125 | 15617.00 | 1952125.00 |
| 2 | Size 10.00*20-16 PR Cross Lugs Tyre Set | 150 | 15837.75 | 2375662.50 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | Size 7.50*16-16 PR Highway Pattern Tyre Set | 100 | 7519.50 | 751950.00 |
| 4 | Size 7.50*16-16 PR Cross Lugs Tyre Set | 60 | 8049.00 | 482940.00 |
| 5 | Size 9.00*20-16 PR Highway Pattern Tyre Set | 30 | 13466.00 | 403980.00 |
| 6 | Size 8.25*20-16 PR Highway Pattern Tyre Set | 30 | 12019.50 | 360585.00 |
| 7 | Size 8.25*16-16PR Highway Pattern Tyre Set | 10 | 8770.50 | 87705.00 |
| 8 | Size 8.25*16-16PR Cross Lugs Tyre Set | 20 | 9186.75 | 183735.00 |
| | | | एकूण रक्कम रुपये | **६५९८६८२.५०** |

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३६०/ठराव क्र.२३६४**

हारमेस सोसायटी ते शास्त्री चौक (नगररस्ता कल्व्हर्ट) पर्यंत भुमिगत ड्रेनेज लाईन व पावसाळी लाईन टाकणे (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ऋतू एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९४,९९,५३५/– पेक्षा २७.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६८,४०,६१५=१५ अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/१११५ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्रमांक :– २३६१/ठराव क्र.२३६५**

प्रभाग क्र. ३० ब मध्ये पाण्याची टाकी ते वारजे फिल्टर प्लॅन्ट पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.विनोद महादेव अगवणे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. ४९,५०,१३३/– पेक्षा ०.५६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४९,२२,४१२=२५ पर्यंत अधिक भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार होणारी रक्कम आदा/वसूल करुन येणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१११६ दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**विषय–**

पुणे महापौर चषक राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा आयोजन करण्यासाठी र.रू.२५ लाखांचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृहनेता यांचे दि.९/२/२०१६ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
मा.अविनाश बागवे–हे कशासाठी आहे? याबाबत माहिती द्यावी.
उपनगरसचिव–राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यासाठी २५ लाख रू.चे वर्गीकरण.
मा.अविनाश बागवे–मग वेगवेगळ्या स्पर्धांसाठी सुध्दा घेतील आणि हे वर्गीकरण कशातून घेतले आहे? याची माहिती द्यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे मा.दोडके साहेबांनी विनंती केली होती कुस्ती स्पर्धेसाठी पैसे कमी पडत आहे.
मा.अविनाश बागवे–साहेब, ऑलरेडी त्यासाठी ५० लाख रू.ची तरतूद आहे आणि आपण इतर खेळांसाठी १ ते २ लाख रू.उपलब्ध करून दिले आहेत. ही मोठी तरतूद आहे. माझी विनंती आहे की, हा विषय १ आठवडा पुढे घ्या. यावर चर्चा होऊ द्या.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.

**विषय–**

पुणे मनपाच्या उद्यानात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यास प्रतिबंध आहे. त्याच धर्तीवर प्रभाग क्र.४८ मधील श्री.अक्कलकोट स्वामी बालोउद्यानामध्ये कोणत्याही प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रक्तदान शिबीर, वह्या वाटप कार्यक्रम, विविध खेळांच्या स्पर्धांकरिता व कोणत्याही सभेसाठी इतर कारणासाठी आयोजकांना उद्यानाचा वापर करण्यासाठी परवानगी देण्यात येवू नये.

वरील कार्यक्रमांसाठी उद्यान वापरण्यास परवानगी दिल्यामुळे उद्यानातील हिरवळीची नासधूस होवून महानगरपालिकेने लाखो रूपयांचे नुकसान होते व कार्यक्रमासाठी उद्यानात विविध ठिकाणी खड्डे खोदल्यामुळे जेष्ठ नागरीकांना व्यवस्थित चालता येत नाही व खड्डयामुळे लहान मुलांना खेळताना दुखापत होण्याची शक्यता असते.

तरी वरील कारणांचा विचार होवून आयोजकांना सदर उद्यानाचा वापर करण्यासाठी परवानगी देण्यात येवू नये,याबाबत मा.सौ.राजश्री आंदेकर यांचे दि.५/२/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–नाही, हा विषय वादाचा होईल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढे घ्यावा.
उपनगरसचिव–हा कार्यपत्रिकेवर घ्यावा लागेल.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– हा कार्यपत्रिकेवर घ्यावा.

**विषय–**

७० मीटर पेक्षा जास्त उंचीच्या इमारतींना विकास परवानगी देताना छाननी करणेसाठी गठीत शासन नियुक्त तज्ञ समिती अध्यक्षांना र.रू.२०,०००/– प्रति महिना व सदस्यांना र.रू.१०,०००/– प्रति महिना याप्रमाणे मानधन अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.म.आ./शहर अभियंता/१०८३ दि.८/२/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, आजचे सर्व वर्गीकरणाचे विषय मा.मुख्यसभा मान्यता देईल या भरवशावर आणि वन–के अंतर्गत मा.मुख्यसभेस दाखल करावेत.
उपनगरसचिव–ठीक आहे.

<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>

**विषय क्र.२२७४**/ठराव क्र.२२७८
स्थानिक संस्था कर कार्यालयाकडील सन २०१५–२०१६ या आर्थिक वर्षातील माहे डिसेंबर २०१५ अखेर व्यापाऱ्यांची नोंदणी व जमा झालेले उत्पन्न याबाबत मा.सह महा.आयुक्त, स्थानिक संस्था कर यांचे जा.क्र. स्थासंक/२८९१० दि. १/२/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय**–मा.सह.महा.आयुक्त, स्था.सं.कर यांनी पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करून नोंद घेण्यात आली.
**विषय क्र.२२७५/**ठराव क्र.२२७९

प्रभाग क्र. ४५ हडपसर स.नं. ५३/९+९ब+१० सलेन पार्ककरीता एमएस फिडर नलिका टाकणेसाठी र.रु. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, याबाबत मा.सौ.विजया वाडकर यांचा दि. २८/१/२०१६ चा प्रस्ताव.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक, सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प विभागामार्फत करावयाची कामे, कोड नं. एफई ६१ अे १११, अ.क्र. १०, हांडेवाडी रोड (ससाणेनगर) येथे रेल्वे उड्डाण पुल उभारणे | १ कोटी | --- |
| <u>**नवीन सुचविलेले काम**</u><br>प्रभाग क्र. ४५ हडपसर स.नं. ५३/९+९ब+१० सलेन पार्ककरीता एमएस फिडर नलिका टाकणे. | --- | १ कोटी |

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
**विषय क्र.२२७६**/ठराव क्र.२२८०

पुणे महानगरपालिकेच्या अभय योजना अंतर्गत मिळकत कराची वार्षीक करपात्र रक्कम(ऐ.आर.व्ही.) र.रुपये २५०००/– पर्यंत करण्यात आलेली होती. तरी मिळकत कराची वार्षीक करपात्र रक्कम(ऐ.आर.व्ही.) ची मर्यादा ठेवण्यात येऊ नये व सरसकट सर्वं मिळकत दारांना अभय योजनेत सहभागी करून मिळकतदारांची वार्षीक करपात्र रक्कम(ऐ.आर.व्ही.) २५०००/– ही अट काढून व अभय योजनेच्या संपूर्ण कालावधीमध्ये मिळकतदारांना ७५% दंडामध्ये सुट देण्यात यावी तसेच अभय योजनेचा कालावधी २ महिने वाढविण्यात यावा, याबाबत मा.सचिन दोडके यांचे दि. २९/१/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–याबाबत असे ठरले होते की, पहिल्यांदा ही योजना संपू द्या त्यानंतर त्याचा आढावा घ्या आणि त्यानंतर हे करता येईल. हा विषय एक महिना पुढे घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार एक महिन्यानंतर करावा.
**विषय क्र.२२७७/**ठराव क्र.२२८१
मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि. २९/१/२०१६ चे पत्र.

संपूर्ण पुणे शहरामध्ये गॅस लाईन टाकणेसाठी, पाण्याच्या नवीन लाईन टाकणेसाठी, विविध केबल टाकण्यासाठी रस्त्यांच्या खोदाई चालू आहे. रस्त्यांची खोदाई चालू असल्यामुळे नवीन रस्ते करण्याचे काम त्वरीत सुरू करणे शकय होत नसल्यामुळे रक्कम रूपये एक कोटी च्या पुढील रस्त्याच्या कामांना दोन माहिने मुदतवाढ देण्यात यावी.

मा.शंकर केमसे–हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
**विषय क्र.२२७८**/ठराव क्र.२२८२
मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.मुकारी अलगुडे यांचे दि. ३/२/२०१६ चे पत्र.

सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकातील पाणी पुरवठा व जलोत्सरण भवन व पथ विभागाची साधारण र.रु.४० लाखाचे पुढील कामास २ महिन्याची मुदत वाढ मिळावी.

सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकातील खालील खात्यांच्या कामास २ महिने मुदत वाढ देण्यात यावी.

सध्या पुणे शहरातील अनेक रस्त्यावर गॅस वाहिन्या (mng) पाणी पुरवठा,ड्रेनेज लाईन टाकणे,निरनिराळया केबल टाकणे ही कामे सुरु आहेत.रस्ते डांबरीकरण करणे,कॉक्रीटीकरण करणे अडचणीचे होत आहे. त्याचप्रमाणे भवनच्या कामासही वारंवार मुदतवाढ देऊन टेंडर मागविली आहेत.तसेच ड्रेनेज व पाणी पुरवठ्याची कामे वेळेत टेंडर प्रोसेस झाल्या नाहीत.त्यामुळे भवन,पथ,ड्रेनेज,पाणी पुरवठयाची कामे वेळेत पूर्ण होत नाहीत व स्पील मध्येही पुरेशी तरतुद नाही.त्यामुळे वरील खात्यातील र.रुपये४० लाखाचे पुढील कामांना २ महिने मुदतवाढ देण्यात यावी.

मा.शंकर केमसे-हा विषय मान्य करण्यात यावा.

**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.२२७९/**ठराव क्र.२२८३

दि.११/१/२०१६ ते दि. १७/१/२०१६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/१०१५ दि. २९/१/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा.अध्यक्षा-अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय**-मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

**विषय क्र.२२८०/**ठराव क्र.२२८४

दि.४/१/२०१६ ते दि. १०/१/२०१६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अशाद/१०१६ दि. २९/१/२०१६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा.अध्यक्षा-अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय**-मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

**विषय क्र.२२८१/**ठराव क्र.२२८५

शहर अभियंता कार्यालय बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ (खराडी व वडगावशेरी) विभागाकडील कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/३७ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १० सन २००९-२०१० ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/१०३२ दि.२/२/२०१६ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

मा.अध्यक्षा-अहवाल ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.

**निर्णय**-सदरचा तक्ता ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.

**विषय क्र.२२८२/**ठराव क्र.२२८६

पासोडया विठोबा मंदिर रस्ता मिलिंग करुन कॉंक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७५,२३,७३०=७४ पेक्षा १.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,२५,९२२=२४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०४४ दि.२/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे-हा विषय मान्य करण्यात यावा.

**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.२२८३/**ठराव क्र.२२८७

मौजे फुरसुंगी उपसागृहे (विहीर क्र. १,२,३,४) व ५ एम.एल.डी.जलशुध्दीकरण केंद्र (तुकाई टेकडी) चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.डेक्कन एंटरप्राईजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५५,४९,५५०=४५ पेक्षा ७.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५५,४९,५५०=४५ (अधिक किमान वेतन कायदा, रजा वेतन, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा वर्गणी, बोनस इत्यादी कायद्यानुसार वेतनामध्ये होणाऱ्या बदलानुसार होणारा फरक) पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१०४९ दि. ३/२/२०१६ चे पत्र.

मा.शंकर केमसे-हा विषय मान्य करण्यात यावा.

**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.२२८४/**ठराव क्र.२२८८

खराडी येथील सातव वस्ती येथील १२० फुटी डी.पी. रस्त्याला जोडणारा १८ मी.डी.पी.रस्त्याचे अर्धवट असलेले काम पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,३९,८४५/- पेक्षा १८.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५५,९६,३६१=१८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०५२ दि.३/२/२०१६ चे पत्र.

मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
**विषय क्र.२२८५/**ठराव क्र.२२८९

प्रभाग क्र. १८ ब वडगावशेरी सनसिटी समोरील उद्यानामध्ये १ इंजिन व २ बोगी असलेली बुलेट टॉय ट्रेन डब्ल्युबीएम रेल ट्रॅकसह टेंडर स्पेसिफिकेशननुसार पुरविणे व कार्यान्वित करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नॅशनल को–ऑपरेटीव्ह कन्झुमर्स फेडरेशन ऑफ इंडिया, नागपूर यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२९,७८,३८७/– (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणतीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार तीनशे सत्याऐंशी फक्त) या दराने सर्व करांसह टेंडरमधील सर्व अटी, शर्ती व विशेष अटीनुसार खरेदी करणे व कार्यान्वित करणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१०५३ दि.३/२/२०१६ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–यामध्ये १ इंजिन आणि दोन बोगीसाठी १ कोटी २९ लाख रू.असे आला आहे. याबाबत दक्षता घ्या.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
**विषय क्र.२२८६/**ठराव क्र.२२९०

पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर भारतीय सौर उर्जा निगम यांनी नियुक्त केलेल्या Clean Max Enviro Energy Solutions Pvt. Ltd. व Hero Solar Energy Pvt.Ltd या यशस्वी कंपन्यांकडून पुणे महानगरपालिकेच्या विविध इमारतींवर RESCO (Renewable Energy Service Companies) मॉडेल पध्दतीने ग्रीड कनेक्टेड रुफटॉप सोलर पी.व्ही सिस्टिम उभारणेस व त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील अनुसूची ड प्रकरण ५(२)(२)अन्वये आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(तां)/१००२ दि. २२/१/२०१६ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३/२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)
मा.अविनाश बागवे–या विषयाला उपसूचना आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयाला उपसूचना आहे.
मा.अनिल राणे–या विषयाला आम्ही उपसूचना देत आहोत.
उपनगरसचिव–विषय क्र.२२८६ साठी मा.ॲड.चंदूशेठ कदम, मा.अनिल राणे,मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी, मा.राहूल तुपेरे, मा.अविनाश बागवे यांची उपसूचना आली आहे

<u>उपसूचना</u>

**सूचक**–मा.ॲड.चंदूशेठ कदम **अनुमोदक**–मा.अनिल राणे,मा.बापूसाहेब कर्णेगुरूजी, मा.राहूल तुपेरे, मा.अविनाश बागवे

**सदरचा विषय, पुणे मनपाने टेंडर जाहिरात देऊन स्वत: प्रकल्प राबवावा व त्यासंबंधीत प्रस्ताव सादर करावा.**

उपनगरसचिव– या उपसूचनेला कोणाचा विरोध आहे का?
मा.सौ.मुक्ता टिळक–या उपसूचनेला विरोध आहे.
मा.अध्यक्षा–यामध्ये मूळ विषय अमान्य करून उपसूचना मान्य करायची आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– यामध्ये अशी उपसूचना आहे की, मनपाने टेंडर जाहिरात काढणे असा विषय आहे आणि यास ज्यांचा विरोध आहे त्यांनी तो करावा.
मा.अध्यक्षा–मा.सदस्यांचा विरोध नोंदवा आणि विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–आमचा विरोध नोंदवू नये तर या विषयाबाबत मतदान घ्यावे.
मा.अविनाश बागवे–या विषयाबाबत प्रशासन माहिती देणार होते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयावर मतदान घ्यावे.
मा.अविनाश बागवे–डॉकेट सुध्दा ठेवायचे आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.उपसूचनेला आमचा विरोध आहे आपण मूळ विषय मान्य करावा.
उपनगरसचिव–या उपसूचनेला विरोध असल्यामुळे मी मतदान घेतो. या उपसूचनेला जे अनुकूल असतील त्यांनी कृपया आपला हात वर करावा.
मा.अविनाश बागवे–यामध्ये उपसूचना मान्य करायची आहे आणि मूळ प्रस्ताव अमान्य करायचा आहे.
उपनगरसचिव–होय,आता या उपसूचेनला जे प्रतिकूल असतील त्यांनी कृपया आपला हात वर करावा.
मा.अध्यक्षा–या विषयाला उपसूचना देत आहोत.
अनुकूल–११
प्रतिकूल–३
**निर्णय**–सदर विषयाबाबतची उपसूचना बहुमताने संमत झाली.
**विषय क्र.२२८७/**ठराव क्र.२२९१

उरुळी देवाची /फुरंसुगी गावामध्ये विविध विकास कामे करणेसाठी खालीलप्रमाणे र.रुपये ६५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/५८६ दि.६/११/२०१५ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, CE19A163, घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत विकेद्रीत पध्दतीने प्रभाग व वॉर्डनिहाय कचरा प्रक्रिया केद्रं उभारणे व तद्नुषगिक कामे करणे | ६५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम**<br>सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक, घनकचरा व्यवस्थापन, CE19A139, उरुळी देवाची /फुरंसुगी गावामध्ये विविध विकास कामे करणे | --- | ६५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३/२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)
मा.अध्यक्षा-हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.२२८८/**ठराव क्र.२२९२
मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि. १२/१/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती ठराव क्रमांक१८८६ व १८८७,दिनांक २२/१२/२०१५ रोजी झालेल्या ठरावानुसार पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) या विभागाने शासकीय कामासाठी भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली मारुती इको या संवर्गातील वाहने घेण्यात येऊ नये असे मोटर वाहन विभागास कळविण्यात आले आहे. त्यानुसार सदर मा.स्थायी समिती ठराव क्र.१८८६ व १८८७ हे निरस्त करून फेर निविदा टेंडर प्रक्रिया करण्यात यावी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३/२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)
मा.बापूराव कर्णे गुरूजी-हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**-सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

**विषय क्र.२२८९/**ठराव क्र.२२९३

मा.सौ.अर्चना कांबळे, मा.श्रीमती स्मिता वस्ते, मा.सौ.लक्ष्मी घोडके, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे व मा.ॲड्.सौ.रुपाली पाटील ठोंबरे यांचे दि. १/२/२०१६ चे पत्र.

पुणे शहरातील महिलांना सबलीकरणाचे महत्व पटवून देण्याकरीता तसेच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीने शहरातील सर्व बचत गटांना एकत्र आणून त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देणेकरीता महिला बचत गटांना दोन दिवसांचा मेळावा गणेश कला क्रीडा या ठिकाणी आयोजित करण्यासाठी तसेच मेळावा आयोजनामध्ये व्याख्यान, सांस्कृतिक मनोरंजनाचे कार्यक्रम, मेळाव्यास येणाऱ्यांसाठी भोजन/चहापान , मेळावा, कार्यालयाचे भाडे इत्यादी तद्नुषंगिक खर्च करण्यासाठी सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील अखर्चीत रकमेमधून तरतुद खर्च करणेस तसेच संबंधितास बिल अदा करणेसाठी मान्यता मिळावी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३/२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)
मा.शंकर केमसे-हा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.२२९०/**ठराव क्र.२२९४
मा.शिवलाल भोसले व मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. २/२/२०१६ चे पत्र.
पुणे महानगरपालिकेच्या अभय योजनेचा कालावधी दिनांक २८/०२/२०१६ पर्यंत वाढविण्यात यावा व सदर अभय योजनेत सरसकट मिळकतदारांना ७५% दंडामध्ये सुट देण्यात यावी.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३/२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)
मा.शंकर केमसे-या विषयाचा विचार एक महिन्यानंतर करावा.
**निर्णय**-सदर विषयाचा विचार एक महिन्यानंतर करावा.

**विषय क्र.२२९१/**ठराव क्र.२२९५

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता बंधनकारक देणगी जशीच्या तशी ठेऊन सार्वजनिक संस्थांना देण्यात येणारी खास देणगी पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवणेकरिता मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(साप्र)/१०२३ दि. २९/१/२०१६ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ३/२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)
मा.शंकर केमसे-हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.अविनाश बागवे-पूर्वीच्या धोरणाप्रमाणे करावे आणि हा विषय अमान्य करावा.
**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते पूर्वीच्या धोरणाप्रमाणे मान्य करण्यात यावा.

**विषय क्र.२२९२/**ठराव क्र.२२९६

सांस्कृतिक केंद्रांस स्वच्छता विषयक कामांसाठी कमी पडणारी खालीलप्रमाणे र.रुपये २०,००,०००/- रकमेचे वर्गीकरण करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/बालगंधर्व/१०४५ दि.२/२/२०१६ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक, सांस्कृतिक केंद्रे, भवन विभागाकडून लॉकिंग, | | |
| 1. RE28A115 | ३,४०,०००/- | --- |
| 2. RE28A123 | ४,६०,०००/- | --- |
| 3. RE28B105 | २,००,०००/- | --- |
| 4. CE28A203 | १०,००,०००/- | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक, सांस्कृतिक केंद्रे, सांस्कृतिक केंद्रांसाठी स्वच्छता विषयक ठेका | --- | २०,००,०००/- |

मा.शंकर केमसे-हा विषय मान्य करण्यात यावा.

**निर्णय**-सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.२२९३**/ठराव क्र.२२९७

पुणे महानगरपालिकेची राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल या सी.बी.एस.ई. बोर्ड मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील ज्युनिअर केजी ते इ. १० वी पर्यंत वर्गांसाठी आणि साहित्य सम्राट विजय तेंडूलकर नाटयगृहासाठी शिक्षक व शिक्षकेतर पदांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून शेडयुल मान्यता देऊन नियमाप्रमाणे पदे भरणेबाबत झालेला महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ८३ दि. २७/१/२०१६ विचारासाठी.

मा.शंकर केमसे-या विषयाची माहिती घ्यायची आहे. हा विषय पुढील सभेत घ्यावा.

**निर्णय**-सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

**विषय क्र.२२९४**/ठराव क्र.२२९८

मा.राजु पवार व मा.ॲड्.रुपाली पाटील-ठोंबरे यांचे दि. ३/२/२०१६ चे पत्र.

गणेश खिंड रोडवरील वीर चाफेकर स्मारक हे ऐतिहासिक महत्वपुर्ण ठिकाण असून ब्रिटीश अधिकारी रँडचा चाफेकर बंधुंनी केलेला वध या ऐतिहासिक घटनेची स्मृती जतन करुन नवीन पिढी व पर्यटकांना आकर्षिक करेल अशा पध्दतीने या स्मारकाचा व परिसराचा विकास करणे आवश्यक आहे. सध्या या ऐतिहासिक ठिकाणी चाफेकरांचा फक्त अर्ध पुतळा अत्यंत अपुऱ्या जागेत बसविण्यात आला आहे. या स्मारकाची यथोचित विकास करण्यासाठी स्मारकाच्या शेजारी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची रिकामी जागा असून त्यापैकी दोन गुंठे जागा पुणे महानगरपालिकेने तातडीने ताब्यात घेऊन स्मारकाचे काम हाती घेण्याची कार्यवाही करणे अत्यंत गरजेचे आहे.

तरी भुमापन विभागामार्फत महानगरपालिकेने तातडीने जागा ताब्यात घेणेची कार्यवाही तात्काळ सुरु करावी.

मा.सौ.मुक्ता टिळक-या विषयाबाबत अभिप्राय घ्यावा.

**निर्णय**-सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-मा.जोशी साहेब, आपल्याकडे प्रमोशनचा नियम काय आहे? जर एकाच तारखेला जर ४ ते ५ जण आपल्याकडे सेवेत रूजू झाले तर त्यांची सेवा जेष्ठता आपण कशी ग्राह्य धरतो? याबाबत नियम काय आहे? याची माहिती द्यावी.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)-मा.अध्यक्षा महोदय, सेवाशर्तीचे जे नियम असतात, सर्व्हिस रूल्स किंवा सेवाजेष्ठतेचे जे नियम असतात. त्यामध्ये साधारणपणे एकाच तुकडी मधून जर एकाच तारखेला कामाला लागले असतील त्यामध्ये त्यांची जी मूळ नेमणूकीची ऑर्डर आहे. मूळ नेमणूकीची ऑर्डर, सरळ सेवेमध्ये जर आले असतील, मूळ नेमणूकीची ऑर्डर असते त्या ऑर्डर मधील क्रम हा सेवाजेष्ठतेला फालो केला जातो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-हा एक नियम.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)-दुसरी गोष्ट, आपले कन्फ्युजन झाले असेल आणि एकाच तारखेला जर तीन लोक झाले असतील तर त्यांच्या वयामध्ये जो सेवाजेष्ठ असतो तो. ज्याचे वय जास्त असते तो एक नंबर वर येतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-आपल्याकडे हा नियम फालो केला जात आहे का?

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)-केला जातो, आणि कोणाचे ऑब्जेक्शन असेल तर आपण प्रारूप सेवाजेष्ठता यादी पब्लिश करतो. ऑब्जेक्शन मागवितो, त्याचे हिअरींग घेतो. हिअरींग घेतल्यानंतर अंतिम सेवाजेष्ठता यादी करतो.

मा.बापूराव कर्णे गुरूजी-आता सह आयुक्त पदाची बढती करताना, ज्याचे वय जास्त आहे त्याला डावलून वय कमी असलेला माणूस वर घेतला आहे. एकाच तारखेला नेमणूका असताना, हे असे झाले आहे का?

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)-आपण कोणत्या केसबाबत म्हणत आहात?

मा.बापूराव कर्णे गुरूजी-वॉर्ड ऑफिसर पदावरून सह आयुक्त नेमताना, आपण तो क्रम ठेवला नाही. हा तक्ता पहा. आता हा विषय चालू आहे. अजून प्रमोशन झालेले नाही.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त (सामान्य प्रशासन)-मा.अध्यक्षा महोदया, ही उप आयुक्त पदाकरीता प्रमोशनसाठी, खालच्या पदावरची जी यादी आहे. ती ही यादी आहे. या यादीची प्रारूप यादी आपण प्रसिध्द केली होती. प्रारूप यादीला हरकती आल्या. प्रारूप यादीच्या हरकतीं नंतर त्यावर हिंअरीग घेतली त्यानंतर प्रशासनाने एक यादी कनफर्म केली त्या यादीला देखील हरकती आल्या. त्यानंतर मा.महा.आयुक्त साहेबांकडे फाईल पूट अप झाली आणि मा.अति.आयुक्त साहेबांच्या लेव्हलवर हा निर्णय झाला. हा निर्णय घेताना दोन गोष्टी विचारामध्ये घेतल्या गेल्या की, एकवेळेस यामध्ये ४ लोकांचाच वाद होता. यामध्ये जे पहिले चार लोक आहेत. ते एकाच ऑर्डर मधून झालेले आहेत. याचवेळेस त्यांचे जनरल बॉडीचे जे धोरण होते किंवा जनरल बॉडीचा जो

ठराव होता. जनरल बॉडी ही त्यांची अपॉईटींग ॲथोरिटी आहे. सक्षम प्राधिकारी म्हणून जनरल बॉडी त्यावेळेसही होती आणि आजही आहे. या जनरल बॉडीने जो क्रम ठरवून दिला आहे. तो मान्य केलेला आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुम्ही आता मला पहिले उत्तर दिले की, एकाच तारखेला जर सेवेत लागले तर त्याचे प्रमोशन करताना त्याची सेवाजेष्ठता, जो वयाने जेष्ठ असेल त्याला प्रमोशन दिले पाहिजे. मग जनरल बॉडीला जर चुकीची माहिती फीड करून दिली असेल आणि जनरल बॉडीने चुकीचे मान्य करून घेतले असेल. तर ते ग्राह्य धरायचे का? म्हणजे आपण आपल्या महाराष्ट्र शासनाची सेवानियमावली आपण मोडीत काढली, असे होईल.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–मा.अध्यक्षा महोदय, जनरल बॉडीचा जो ठराव आहे तो आजपर्यंत अबाधीत आहे. त्यामुळे जनरल बॉडीने जो क्रम ठरवून दिलेला आहे. तोच प्रशासनाने स्वीकारलेला आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–म्हणजे खात्याने जनरल बॉडीला चुकीची माहिती फीड केली आणि ती जनरल बॉडीने मान्य केली तर आपण चुकीचा नियम फालो करतो.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)– मा.अध्यक्षा महोदया, जनरल बॉडीने जो ठराव केलेला आहे. त्या ठरावामध्ये, जनरल बॉडी ही सक्षम प्राधिकारी आहे. जनरल बॉडीला पूर्णपणे नेमणूकीचे अधिकार त्यावेळेसही होते आणि आजही आहेत त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविलेला क्रम विचारात घ्यावा, अशा पध्दतीच्या स्पष्ट सूचना, सेवानियमामध्ये, सेवाजेष्ठतेच्या नियमामध्ये आहेत आणि त्या आपण फालो करून त्याप्रमाणे फायनल डिसीजन घेतलेला आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–एक लक्षात घ्या, तो कोर्टात गेला तर त्याला न्याय मिळेल. फक्त वेळ जाईल लक्षात घ्या. महाराष्ट्र..

मा.सौ.मुक्ता टिळक–नाही, त्यामध्ये असे आहे का, की आता तुमची जी नियमावली आहे. त्या नियमांनाही काही प्राधान्य असते की नाही?

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–आपल्याकडे यामध्ये..

मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही वयाला प्राधान्य देता, तुम्ही आता काय केले की, तुम्ही जनरल बॉडीच्या म्हणण्याला प्राधान्य दिले. पण त्यात पण तुम्हाला असे ठरवून दिलेले आहे वयाला प्राधान्य द्या, मग?

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)–मा.अध्यक्षा महोदया, गुणवत्तेवर जी सेवक निवड समिती असते ती जो क्रम लावते तो गुणवत्तेच्या आधारे लावते आणि गुणवत्तेच्या आधारे लावून ते जसेच्या तसे डॉकेट जनरल बॉडीकडे जाते आणि जनरल बॉडीने अंतिम: मान्यता दिल्यानंतर, त्याची ऑर्डर निघते. जनरल बॉडीची जी मान्यता आहे ती आपण ग्राह्य धरली कारण सक्षम प्राधिकारी जनरल बॉडी आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मग महानगरपालिकेला सेवा नियमावली मान्य नाही.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–मा.अध्यक्षा महोदया, सेवा नियमावली मध्येच ही स्पष्टपणे तरतूद आहे की, सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविलेला क्रम विचारात घ्यावा, अशीच स्पष्ट तरतूद सेवा नियमावली मध्ये आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविताना सुध्दा गाईड लाईन्स आहेत ना! गाईड लाईन आहे का नाहीत?

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त (सामान्य प्रशासन)– मा.अध्यक्षा महोदया,त्याप्रमाणेच जो ठराव मंजूर झालेला आहे. तो आजपर्यंत अबाधित असल्यामुळे ठराव विचारात घेतलेला आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुम्ही या बोटावरचे त्या बोटावर करीत आहात. सक्षम प्राधिकाऱ्याला गाईड लाईन आहेत की नाहीत? हे उत्तर द्या.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– मा.अध्यक्षा महोदया,सक्षम प्राधिकारी म्हणजे जनरल बॉडी आहे जनरल बॉडीने जो ठराव केला आहे, प्रशासनाकडून जे डॉकेट..

मा.बापूराव कर्णे गुरूजी–गाईड लाईन आहेत. तुम्ही एखादे चुकीचे जनरल बॉडीला पूट अप केले आणि जनरल बॉडीने मान्य केले.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– मा.अध्यक्षा महोदया,जनरल बॉडीकडे प्रशासनाचा जो ठराव गेलेला आहे. तो सरळ सेवेची भरती आहे. गुणानुक्रमानुसार केलेला आहे त्यामुळे तो चुकीचा आहे, असे आज आपल्याला ठरविता येणार नाही. तो जो ठराव गेलेला आहे, डॉकेट गेलेले आहे त्याला जनरल बॉडीने मान्यता दिलेली आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आता ज्या नेमणूका करीत आहात त्यामध्ये १०० टक्के तुम्ही शासनाचा जो सेवानियमावलीचा नियम आहे. तो आपण डावलून त्यामध्ये जनरल बॉडीचा समावेश करून तुम्ही अंमलबजावणी करीत आहात.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–सेवाजेष्ठतेच्या नियमामध्ये या दोन्ही, तिन्ही तरतूदी आहेत. प्रमोशनला जाताना कसे? सरळ सेवेमध्ये जाताना कसे? दोन्ही तरतूदी आहेत. त्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविलेला जो क्रम आहे तो ग्राह्य धरावा अशी स्पष्ट तरतूद सेवा नियमावली मध्ये आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुम्ही पुन्हा तिथेच आलात. जनरल बॉडीकडे डॉकेट आल्यानंतर त्याची जर शहानिशा झाली नाही तर मान्य, मान्य असे होते म्हणून तुम्हाला सांगितले. शासनाने घालून दिलेल्या नियमावलीला फाटा देऊन जर काही चुकीचे डॉकेट ठेवले आणि ते मान्य झाले तर ते ग्राह्य.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–जे डॉकेट ठेवले गेलेले आहे ते डॉकेट त्यावेळची जी समिती आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–यापूर्वी जे, जे कोर्टात गेले. ते कोर्टात सक्सेस झाले. तुमच्या जनरल बॉडीला तिथे मानले नाही. सेवा नियमावली ही अंतिम आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक –मग हे कशासाठी? आपण नियमावली कुठल्या बाबतीमध्ये फालो करायचीच नाही का? मग सगळीकडे जनरल बॉडी ठरवेल त्याप्रमाणे होईल ना!

मा.बापूराव कर्णे गुरूजी–काय मनमानी होईल हो! तुम्ही नीट लक्षात घ्या.

मा.सौ.मुक्ता टिळक –सेवा जेष्ठता आणि ही जी नियमावली शासनाने ठरविलेली आहे. या नियमावलीला काही अर्थ नाही, असे समजायचे का?

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–मॅडम पुन्हा एकदा सांगतो, नियमावली ही तरतूद आहे की जर सक्षम प्राधिकाऱ्याने ठरविलेल्या..

मा.सौ.मुक्ता टिळक –यामध्ये काहीतरी म्हणजे ऑप्शनल केसेस मध्ये असे आहे.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–ज्या ठिकाणी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला क्रम आहे तो विचारात घ्यावा.

मा.सौ.मुक्ता टिळक –सक्षम प्राधिकाऱ्याचा क्रम, ऑप्शनल केसेस मध्ये आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–तुम्ही एक लक्षात घ्या की, सेवा नियमावलीला सोयीस्कर अर्थ लावून आपण प्रमोशन देतो, असा त्याचा उघड उघड अर्थ आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक –बरोबर आहे.

मा.मंगेश जोशी,उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– मा.अध्यक्षा महोदया,ही जी प्रक्रिया आहे ती रितसर होते. यामध्ये आपण प्रारूप यादी पब्लिश करतो. प्रारूप यादीला त्यांना हरकत घ्यायला पूर्णपणे मुभा असते. हरकत घेतल्यानंतर हरकतीवर, त्यांची हिंअरींग घेतली जाते. हिंअरींग घेतल्यानंतर त्याचीही अंतिम यादी केली जाते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–जोशी साहेब, आपण चुकीचा पायंडा पाडत आहोत. त्याला न्याय मिळेल पुन्हा, पण त्याने भांडल्यानंतर न्याय मिळेल पण तो न्याय देताना सुध्दा आम्ही सांगणार आहे की, ज्यांनी हा निर्णय घेतला त्यांच्यावर कारवाई व्हावी.

मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)– अंतिम यादी जी पब्लिश केलेली आहे. मा.अध्यक्षा महोदया, त्या अंतिम यादीच्या मध्ये पुन्हा काही हरकत असेल तर पुन्हा अपील करायचे असेल तर त्यासाठी सुध्दा तरतूद असते.
मान्य आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक –नाही, मग या स्पष्ट नियमावलीला अर्थ काय आहे?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–शासनाची सेवा नियमावली सोयीस्कर वापरली जाते एवढेच मला म्हणायचे आहे.

मा.अविनाश बागवे –यामध्ये मा.बकोरिया साहेब, हा जो प्रश्न उपस्थित केला आहे तो एकदम बरोबर आहे. प्रशासनाला जसे वाटते की, मला हे असे करायचे आहे तर ते तसेच करतात. आम्ही जर कोणाला सांगितले की, याची बदली करायची आहे आम्ही म्हणजे कोणीपण नॉट मी पर्सनली. कोणत्याही सभासदाने सांगितले किंवा कोणी तरी सांगितले तर असे उत्तर मिळते की, अजून त्यांची ३ वर्षे पूर्ण झाली नाही. परंतु यांना जसे आवश्यक असेल तर लगेच एक आठवड्यात आलेला जे.ई.बदलून जातो. ह्यांना जे वाटते, जो जे.ई, म्हणजे आता खूप धाडसाचे होईल. बऱ्याच गोष्टी मी ऑन रेकॉर्ड बोलू शकत नाही. पण जे भेटणार, चर्चा करणार त्यांच्या बदल्या आणि ज्यांची तीन, तीन वर्षे झालीत परंतु गाठीभेटी झाल्या नाहीत. त्यांच्या बदल्या होत नाहीत. आमच्याच प्रभागामध्ये आमच्याच वॉर्ड ऑफिसला दोन, तीन उदाहरणे आहेत. मग कशावरून हे? प्रमोशन दिले तो व्यक्ती पुन्हा परत बांधकाम विभागातच जातो. ते कसे काय? सभासद तुमच्या बजेटच्या सभेमध्ये ओरडून ओरडून थकतात की, तेच तेच चेहरे तिथे दिसत आहेत. मग प्रशासन हे कसे काय करते? आता सांगितले की, सेवानियमावली आहे मग ती पूर्णपणे फालो तरी केली पाहिजे. आपले इंटरपिटीशन आपल्या माध्यमातून करायचे आणि तेवढेच फक्त इंटरपीट करायचे आणि इंम्पलिमेंट करायचे. ही कुठली पध्दत आहे? साहेब थोडेसे लक्ष ठेवा. ज्या पध्दतीत बदल्या चालू आहेत, ज्या पध्दतीत प्रमोशन चालू आहेत. खूप मोठ्या प्रमाणात चुकीच्या गोष्टी होत आहेत. एखादा कोणी कोर्टात गेला किंवा मा.सभासद यांच्याकडून प्रश्नोत्तरांमध्ये काही गोष्टी ऑन रेकॉर्ड आल्या तर मग अधिकाऱ्यांना उगाच त्रास होणार आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मी विचारले आहे ते रेकॉड करण्याकरिताच विचारले आहे ते कोर्टात दाखविण्यासाठी आहे. कारण त्याला हे कोर्टात दाखविता येईल.
नाही पण अजूनही या गोष्टीत हे लक्षात येत नाही.

मा.अविनाश बागवे –मा.बकोरिया साहेब, तुम्हाला शपथ वैगेरे दिली आहे का? कारण तुम्ही काही बोलत नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक –कारण तुम्ही काहीच बोलत नाही.

मा.अविनाश बागवे –तुम्ही काही बोलत नाही, तुम्ही काही निर्णय पण घेत नाही. तुम्ही काही कारवाया सुध्दा घेत नाही. नाही, मी माझा अनुभव सांगतो. मीच तुमच्याकडे तीन चार महिन्यांपासून, तीन चार आठवड्यापासून काही गोष्टी फालोअप करीत आहे. मी बघतो, मी पुढच्या आठवड्यात करतो. तुम्हाला स्टॅंडिंगमध्ये दोन तीन विषय विचारले परंतु मी पुढच्या आठवड्यात सांगतो, असे सांगता. तुम्ही सांगतो म्हणता पण इथे मौन बाळगता.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (वि)–तुमचा जो विषय आहे तो मा.आयुक्त साहेबांकडे पाठविला आहे ते पुढील स्टॅंडिंग कमिटीमध्ये येत आहे.

मा.अविनाश बागवे –साहेब, अनेक विषय आहेत परंतु तुम्ही पुढच्या आठवड्यात करतो, असेच सांगता.

मा.सौ.मुक्ता टिळक –मला या विषयावर अशी माहिती हवी आहे की, शासनाने जी नियमावली ठरवून दिली आहे. त्या नियमावलीत सुध्दा नेमणूकांचा प्राधान्यक्रम आहे ते आपण फालो करीत नाही. आपण फक्त त्यातील एका क्लॉजचा विचार करीत आहोत आणि तोच क्लॉज आपण धरून बसलो आहोत, असे प्रत्येक आपल्या सोयीनुसार आपण करू शकतो का?

मा.अविनाश बागवे –या सेवा नियमावलीमध्ये आपण इंजिनिअर आणि डॉक्टर्स यांच्या डिग्री संदर्भातील प्रश्न विचारले होते. त्याठिकाणी डॉक्टर्संबाबत उत्तरे आली. मा.अध्यक्षा, लेखी उत्तर आले की, हे मान्यता प्राप्त विद्यापीठातून नाही. तरी सुध्दा मा.आयुक्त साहेबांनी हे, चालते म्हणून असे करून दिले आहे. ही वस्तुस्थिती आहे. त्यांचे लेखी उत्तर आहे म्हणजे असे काही असले तरी मा.आयुक्त साहेब मान्यता देतात.

मा.अध्यक्षा–असे काही असेल तर लेखी ठेवत जा.
मा.अविनाश बागवे –हे ऑन रेकॉर्डच आहे. आपण विचारून घ्या. ते समोर बसले आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हे सिरीअस आहे, तुम्ही एखाद्याला प्रसन्न करून घेतल्यावर तुम्ही काहीही निर्णय करू शकता! हा त्यातला निर्णय आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक –ही नियमावली आपण सोयीस्कर वापरत आहोत. हा त्यातला मुद्दा आहे.
मा.अविनाश बागवे –जसे प्रशासनाच्या सोयीने बदली करतात तसेच प्रशासनाच्या सोयीने अंमलबजावणी करतात. ही वस्तुस्थिती आहे.
मा.अध्यक्षा–सर, सेवक वर्ग तक्त्याचे काय झाले?
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–दिला आहे.
मा.अध्यक्षा–कुठे?
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–पारखी साहेबांच्याकडे.
मा.अध्यक्षा–कधी?
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–परवा दिवशी.
मा.अविनाश बागवे –आले आहेत का?
उपनगरसचिव–ते माझ्याकडे नाहीत. ते पारखी साहेबांकडे दिले आहेत असे म्हणत आहेत.
(सभागृहात गोंधळ होता)
मा.अध्यक्षा–आमचे जे म्हणणे होते की, आम्हाला तुम्ही संपूर्ण सेवकवर्ग तक्ता दिला पाहिजे. तो आमच्याकडे कधी येणार?
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–तो पारखी साहेबांकडे दिला आहे.
मा.अध्यक्षा–हे तुम्हाला सांगून किती दिवस झाले?
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–ज्या दिवशी मिटींग झाली त्या दिवशीच दिला.
मा.अध्यक्षा–किती दिवस झाले?
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–३ ते ४ दिवस झाले.
मा.अध्यक्षा–नाही, मागच्या वेळी स्थायी समितीमध्ये सुध्दा आम्ही ही मागणी केली होती म्हणजे ८ दिवस होउन गेले.
मा.मंगेश जोशी, उप आयुक्त(सामान्य प्रशासन)–मॅडम मी चेक करतो आणि परत एक कॉपी काढून देतो.
मा.अध्यक्षा–म्हणजे काहीतरी प्रॉब्लेम होत आहे. तुमच्याकडून काहीतरी राहिले. तुम्ही मा.स्थायी समितीची दखल नीट घेतलेली नाही.
मा.अविनाश बागवे–श्रीमती कळसकर मॅडम, आता बजेटचे काम चालू आहे आणि जर वेतन कट झाले तर?
मा.अध्यक्षा–आम्ही आता तेच करणार आहोत. तुम्ही जर सेवकवर्ग तक्ता ठेवला नाही याचा अर्थ तुम्हाला सेवकांची गरज नाही याचा अर्थ तुम्हाला वेतनाची गरज नाही. मग आता वेतनाला काट मारते. तुम्हाला जर सेवकवर्गाच्या तक्त्याला मा.स्थायी समितीची मान्यता घ्यायची नाही, याचा अर्थ तुम्हाला सेवकांची गरज नाही, वेतनाची गरज नाही.
मा.अविनाश बागवे– त्यावेळी मा.अति.आयुक्त,बकोरिया साहेब सुध्दा म्हणाले होते की, दोन दिवसामध्ये सादर करावयास लावतो.
मा.सौ.मुक्ता टिळक–१०० सेवक भरावे लागणार आणि त्यासाठी म्हणून यादी ठेवणार, अशी चर्चा झाली होती.
मा.अध्यक्षा–म्हणजे आजच्या स्थायी समितीला सुध्दा मान्यतेसाठी दिलेले नाही. आज समितीसमोर आणायला नको का? म्हणजे हे गृहीत धरून चालले आहेत. अंदाजपत्रकामध्ये अशीच आपण अंदाजेच तरतूद करायची म्हणजे यावरून एक गोष्ट सिध्द होते की, तुम्हाला काही सेवकांची आवश्यकता नाही, गरज नाही. त्यामुळे तुम्ही अंदाजपत्रकात वेतनासाठी जे काही पैसे मागितले आहेत त्याला मी आता कट मारते. हे तुम्ही जे सिध्द करून दाखवित आहात. इथे सगळे अधिकारी आहेत आणि ते त्यांच्या त्यांच्या खात्याला जे काही सांगायचे आहे ते सांगतील. प्रशासन स्थायी समितीला गृहीत धरून चालले आहे. चला हे करतील, हे काही नाही थोडेस बोलतील आणि आपल्या मनासारखेच होणार आहे, असेच चालले आहे.
मा.अविनाश बागवे–याचे अजून एक उदाहरण आहे. एल.बी.टी.चे उदाहरण, त्यांनी जो तक्ता दिला होता त्या तक्त्याच्या अनुषंगाने १६५ कोटी रू. गेल्यावर्षी पेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त झाले आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–डिसेंबर अखेर.
मा.अविनाश बागवे–होय, अभय योजनेमुळे टॅक्सचे पैसे सुध्दा वाढले आहेत म्हणजे उत्पन्न वाढत आहे. चांगले कलेक्शन होत आहे. हे सगळे असताना सुध्दा देणगी देऊ नका किंवा मग २० टक्के सरसकट जे कट केले. तुमच्या विद्युत विभागातील सगळयांच्या विकास कामातील कट केले म्हणजे त्यांना जे वाटते ते सरसकट करणार.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–तसे नाही, आणि नवीन कामाला पैसेच धरले नाहीत. फक्त स्पील ओव्हर धरले आहेत.
मा.अविनाश बागवे– मा.अध्यक्षा, या ठिकाणी पी.एम.पी.एम.एल.बद्दल माहिती हवी आहे. मा.बकोरिया साहेब, पी.एम.पी.एम.एल.च्या अहवालाबद्दल कित्येक महिन्यांपासून, पुढील आठवड्यात देऊ असेच सांगितले जात आहे. आम्ही आणखी किती महिने वाट बघायची? दुसरा एक मुद्दा असा आहे की, हडपसर बी.आर.टी.मार्गासाठी आपल्या बजेट मध्ये ३ कोटी रू.ची तरतूद होती. आपण कोणते काम केले? याबद्दल माहिती द्यावी. आता जर माहिती उपलब्ध नसेल तर ती पुढील आठवड्यात द्यावी. आमच्या क्षेत्रिय कार्यालयाकडील अतिक्रमण कारवाई बाबतची माहिती द्यावी की, आम्ही स्नॅक्स सेंटरवर कारवाई करण्याबाबत सूचना केली होती आणि तीन चार आठवड्यापासून आम्ही यासाठी पाठपुरावा करीत आहोत.

मा.माधव जगताप,उप आयुक्त (अतिक्रमण)–ते स्नॅक्स सेंटर भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाच्या समोर आहे. त्यांच्यावर वारंवार कारवाई होत आहे.

मा.अविनाश बागवे– वारंवार नाही पण खूप आधी केली होती आणि ती सुध्दा आम्ही सांगितल्यानंतर केली होती. आपल्या एका दुसऱ्या कारवाईबद्दलची व्हिडीओ क्लीप मी सर्वांना पाठविली होती. त्यामध्ये संबंधीत दारूच्या दुकानावर कारवाई होत असताना, पोलीस संबंधितांना जीप मधून पकडून घेऊन गेले आणि त्यावेळी आपले इन्सपेक्टर आणि कर्मचारी त्यांच्या गाडीमध्येच बसून राहिले. त्यांनी तेथील शेड पाडणे किंवा इतर कारवाई करणे अशी कोणतीही कारवाई केली नाही. यामुळे गुंजन थिएटरच्या बाबतीत जे झाले तेच तिकडे होणार? आधी ते फक्त टेबलवर होते नंतर शेड टाकले आणि लोकांना बसण्यासाठी शेड केले आहे आणि मग अशाने ते भविष्यात हळू हळू वाढत जाणार.

मा.माधव जगताप,उप आयुक्त (अतिक्रमण)–आम्ही तिथे व्हिजीट करू.

मा.अविनाश बागवे– ते आपल्या हॉकर्सच्या सर्वेक्षणामध्ये नाही. ते पूर्णत: बेकायदेशीर आहे तरीसुध्दा आपले प्रशासन त्यांना संरक्षण का देत आहे? हे कळत नाही.

मा.माधव जगताप,उप आयुक्त (अतिक्रमण)–सर, त्या भागात पठाण सर, हे सहायक आयुक्त आहेत. मी त्यांना बोलावून घेतो आणि यावर कायमस्वरूपी उपाययोजना करू. मी त्यांना उद्या बोलावितो आणि या आठवड्यामध्ये त्याबाबत निर्णय घेऊ.

(पी.एम.पी.एम.एल.चे अधिकारी उपस्थित झाल्यानंतर पुढील प्रमाणे चर्चा करण्यात आली.)

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, पी.एम.पी.एम.एल.चा अहवाल कधी येणार आहे?

मा.द.गा.मोरे,मुख्य कार्य.अधिकारी (पी.एम.पी.एम.एल.)–मा.चेअरमन साहेब, पी.एम.पी.एम.एल.चा अहवाल तयार केलेला आहे. फक्त सी.एम.डी.साहेबांचे पेरोजल बाकी आहे. तो अहवाल त्यांना दाखवायचा आहे. तो आजच तयार झाला आहे.

मा.अविनाश बागवे–सदरचा अहवाल पुढील आठवड्यामध्ये द्यावा. मागील वेळेस जो अहवाल दिला होता त्यामध्ये काहीही आकडेवारी नव्हती तो फक्त निबंध होता.

मा.द.गा.मोरे,मुख्य कार्य.अधिकारी (पी.एम.पी.एम.एल.)–आताच्या अहवालामध्ये आकडेवारी आहे.

मा.अविनाश बागवे–आपण सेवकांची फरक रक्कम दिली का?

मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी,(पी.एम.पी.एम.एल.)–अद्याप दिलेली नाही. आणखी पिंपरी चिंचवडकडून ४० कोटी रू.रक्कम यायची आहे. महापालिकेची ५० कोटी रू.रक्कम मिळाली आहे या दोन्ही रकमा मिळून सर्व कर्मचाऱ्यांना फरक दिला जाईल.

मा.मुक्ता टिळक–हे स्थायी समितीच्या निदर्शनांस आणून दिले नाही.

मा.अध्यक्षा–मा.स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर, पी.एम.पी.एम.एल.चा धनादेश कोणाकडे दिला? याबद्दल माहिती द्यावी. तुम्हाला आवश्यकता नाही का? पी.एम.पी.एम.एल.ने हा धनादेश कोणाकडून घेतला?

मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–आम्हाला आवश्यकता आहे.पी.एम.पी.एम.एल.चे कॅफो यांनी हा धनादेश घेतला होता.

मा.अध्यक्षा–तुम्हाला पुढील वर्षी पैशांची आवश्यकता नाही का?

मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–निधी लागणारच आहे.

मा.अध्यक्षा–मग आता आपण त्याची वाट पहा. मी देणार नाही. कारण तुम्ही सरळ सरळ आमचे अधिकार वापरू लागला आहात. आम्ही कोणाचे अधिकार वापरतो का?

मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–नाही.

मा.अध्यक्षा–मग तुम्हाला एवढा प्रोटोकॉल पाळता आला नाही का? आम्ही सगळे १६ सभासद वेळ काढून इथे महत्वाचे निर्णय घेण्यासाठी इथे उपस्थित असतो. आम्ही तुम्हाला सन्मानाने धनादेश दिला असता. तुम्ही स्थायी समितीचे अधिकार का वापरले? ही जबाबदारी श्रीमती कळसकर यांची होती.

मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–आपण कॅफोच्या हाती देतो आणि नंतर मग ते कोणाकडून घ्यायचा हा कार्यक्रम नियोजित करतात.

मा.अध्यक्षा–मा.गुरूजी याबद्दलची आता पर्यंतची पध्दत सांगा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण धनादेश ट्रेझरीमध्ये टाकल्यानंतर मा.अध्यक्षांना कळविले पाहिजे की, आम्ही हे अशा प्रकारे करीत आहोत.

मा.श्रीमती कळसकर मुख्यलेखापाल–मा.आयुक्त साहेबांनी पी.एम.पी.एम.एल.ला दूरध्वनी करून कळविले होते.

मा.अध्यक्षा–म्हणजेच तुम्ही आम्हाला काहीही कळविणार नाही. तुम्ही जे केले आहे ते तुम्हाला योग्य वाटत असेल तर ठीक आहे.

मा.अविनाश बागवे–ही बाब मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणली असती तर एक कार्यक्रम झाला असता परंतु आता हा एक वैयक्तिक परस्पर कार्यक्रम झाला.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यांचे डिमांड लेटर आले का?

मा.अविनाश बागवे–मा.गुरूजी, यामध्ये त्यांचा सुध्दा विषय नाही. ते सगळे तेथून झाले.

मा.अध्यक्षा–त्यांच्या खात्याकडून आणि मुख्य जबाबदारी त्यांची आहे. त्यांचे पद काय आहे? ही त्यांची जबाबदारी नाही का?

मा.अविनाश बागवे–हा सगळा वादंग श्री.मोरे साहेबांमुळे झाला आहे.

मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–डिमांडचा प्रश्नच येत नाही आपण यापूर्वी सुध्दा त्यांना ३ हप्ते दिले आहेत आपण फक्त त्यांना त्या ठरावाप्रमाणे देतो. यासाठी आपण डॉकेट ठेवत नाही.

मा.अध्यक्षा–मॅडम,मला तुमचे पद सांगा. तुमचा या महानगरपालिकेमध्ये जो अधिकार आहे तो काय आहे?

मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–कॅफो.
मा.अध्यक्षा–कॅफो म्हणजे काय?
मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–चीफ अकौंटंट फायनान्स ऑफिसर, मुख्य लेखा वित्त अधिकारी.
मा.अध्यक्षा–मॅडम मला तुमच्या जबाबदाऱ्या सांगा.
मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–मॅडम, आम्ही कुठलाही चेक कुठल्याही पदाधिकाऱ्याला कधीही देत नाही. चेक काढण्यासाठी बिल येते.
मा.अध्यक्षा–पदाधिकारी आणि माझ्यामध्ये काय फरक आहे?म्हणजे या खुर्चीचा अधिकार काय आहे?
मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–आम्ही आजपर्यंत कुठल्याही स्थायी समिती अध्यक्षांना धनादेश दिले नाहीत.
मा.अध्यक्षा–स्थायी समिती अध्यक्षांना अधिकार काय आहेत? ते सांगा. तुमच्या खात्याशी संबंधीत जे असतील ते सांगा.
मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–आपण ते धनादेश त्यांना देतो आणि मग ते पदाधिकाऱ्यामार्फत घेतात.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मॅडम, तुम्ही तो धनादेश कोणाला दिला?
मा.श्रीमती कळसकर,मुख्यलेखापाल–त्यांच्या कॅफोंना हा धनादेश दिला होता. त्यांचे कॅफो येऊन चेक घेऊन जातात.
मा.अध्यक्षा–मग येथून पुढे तुम्ही विचार करा की, पी.एम.पी.एम.एल.चे विषय मा.स्थायी समितीमार्फत जावेत की काय करायला पाहिजे? आणि त्यांना जर स्थायी समितीची गरज वाटत नसेल तर आपल्याकडे पी.एम.पी.एम.एल.चे विषय मान्यतेसाठी आले नाही पाहिजेत. ते महानगरपालिकेकडून देतात आणि आता ते हा विषय पी.एम.पी.एम.एल.वर ढकलत आहेत. त्यांच्या खात्याकडून, प्रशासनाकडून स्थायी समितीकडे मान्यतेसाठी विषय सुध्दा आले नाही पाहिजेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्या चेकचा कॅफोकडून प्रवास कसा झाला? ते सांगा. तुम्ही तो चेक मा.आयुक्त साहेबांच्या ताब्यात दिला का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–मग मा.महापौर यांच्याकडे दिला होता का? तर नाही आणि ते असे सांगत आहेत की, चेक कॅफोने घेतला आणि तो जमा केला.
मा.अध्यक्षा–ते सगळे माहिती आहे. ते आता स्वत:च्या सरंक्षणासाठी सगळे सांगणार नाहीत. यामध्ये काय काय राजकारण घडले? ते सुध्दा माहिती आहे.
मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–मी त्या दिवशी पिंपरी चिंचवड मध्ये बैठकीसाठी गेलो होतो.
मा.अध्यक्षा–आता तुम्हाला स्थायी समितीकडून आणखी किती पैसे द्यायचे आहेत?
मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–५० कोटी रू.द्यायचे आहेत.
मा.अध्यक्षा–ते कोणत्या वर्षात द्यायचे आहेत?
मा.द.गा.मोरे, मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–ते चालू आर्थिक वर्षात द्यायचे आहेत.
मा.अध्यक्षा–ते पैसे तुम्हाला प्रशासन परस्पर देणार आहे आणि यासाठी मा.स्थायी समितीने यापूर्वीच मान्यता देऊन ठेवली आहे.
मा.द.गा.मोरे,मुख्य कार्य.अधिकारी(पी.एम.पी.एम.एल.)–यामध्ये ५०,५० कोटी रू.चे ३ हप्ते आहेत. आमची १९० कोटी रू.ची मागणी होती आणि मा.स्थायी समितीने १५० कोटी रू.ची मागणी मान्य केलेली आहे आणि त्यापैकी दोन हप्ते मिळाले आहेत आणि आणखी एक हप्ता राहिला आहे.
मा.अध्यक्षा–त्याची अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे, ठीक आहे.

अशा पध्दतीने सभा समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

**उपनगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**